मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

★ या अंकांतील लेखक ★

द. वि. सोमण

द. बा. महाजन, बी. ए.

पु. शि. रेगे, बी. एस्सी. (लंडन)

श्रीराम अत्तरदे, एम. ए.

बा. म. दाभाडे, एम. ए.

साहित्यानंद

★

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक

वा. ना. देशपांडे

ऑक्टोबर १९४७ किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

* * *

कविता
१ याच तटिनी-तटीं–'पद्मा', जी. ए, ...३०७
२ शापिता–द. चि. सोमण, ...३०८

थोरांचा परिचय
१ तुकाराम जयराम केदार–द. आ. महाजन, बी. ए. ..३११

प्रबंध
१ आधुनिक कवितेच्या निमित्ताने (लेखांक दुसरा)
प्रा. पु. शि. रेगे, बी. एस्‌सी. ...३१३
२ केशवसुतांची 'स्वप्नसृष्टि' (लेखांक तिसरा)
श्रीराम अत्तरदे, एम्. ए. ...३१७
३ कलाकृतीच्या संरक्षणार्थ–बा. मा. दाभाडे, एम्. ए. ...३२१
४ साहित्याच्या सृष्टींत–'साहित्यानंद' ...३२४

ललित गद्य
गोड रहस्य–१ (एकांकिका)–द. चिं. सोमण ...३३०

विविध
१ संघवार्ता ...३४२
२ संपादकीय ...३६६

* * *

महाविदर्भातील अभिनव वाङ्‌मयीन मासिक
पूजा
१० नोव्हें. ४७ ला दिवाळी अंक म्हणूनच प्रसिद्ध होणार.
मार्गदर्शक : : संपादक : : सहाय्यक
ग. त्र्यं. माडखोलकर, ना. रा. शेंडे, प्रा. अ. ना. देशपांडे. महाराष्ट्रांतील
नामवंतांचे विविध लिखाण वाचा. आकर्षक रंगीत मुखपृष्ठ : मूल्य ८ आ.
वा. व. ५ रु. एजन्टांनी त्वरा करावी : कमिशन भरपूर.
मॅ. ल. वा पडोळे. 'पूजा'ऑफिस धंतोली नागपूर.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक १० वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

आक्टोबर
१९४७

याच तटिनीतटीं—

ये जरा हिंदु या—रम्य तटिनी-तटीं
खेळवीलें जिने आपणां निजकटीं

याच तटिनी-तटीं शशि सुधा वर्षतां
मित्रगण जमवुनी खेळलों कितिकदा !

याच जल-दर्पणीं बिंब निज देखुनी
तूं नि मी हर्षलों-नाचलों शिशुपणीं !

याच तटिनी-जलीं मुक्त-मन डुंबलों
—नील नभिं पाखरें-जलिं तसें पोहलों !

याच तटिनी-तटीं रानजुइचीं फुलें
गुंफुनी तूंच मम केश शृंगारिलें !

याच तटिनी-तटीं रम्य सायंतनीं
दिव्य रंगावली अंबरीं देखुनी—

पाय जलिं सोडुनी बैसलों रंगुनी
सृष्टिचें रूप तें मुग्ध मधु पाहुनी

याच तटिनी-तटीं बाल्य मम रेखिलें
हींच कौतुक करी यौवनीं आपुलें !

गोड गुपितें तिने ऐकिलीं चोरुनी
तींच या गुणगुणे आपुल्या गायनीं !

त्याच सखि-संगतीं ये जरा विहरुं या
तोच स्मृति-चित्रपट पुनरपी पाहुं या !

—'पद्मा.'

*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शापिता

[राजकवि टेनिसन् कृत ' लेडी ऑफ शॅलॉट् '
या कवितेचा अनुवाद.]

-१-

नदीतटाच्या दो बाजूंनी
अफाट काळी झाकित धरणी
क्षितिज चुंबिती दूर जाउनी
हिरवीं कुरणें, ज्यांतुनि धावुनि
पथही चुंबी पुरी ' रम्यता '

' शापद्वीपा ' पूर्ण वेढुनी
लाल पांढऱ्या मोहक नलिनी
प्रभातिं रमती सतत नर्तनीं,
पथांतुनी त्या आणि कधि कुणी
बघति निरखुनी येतां जातां

उठविति झुळुका जलांत लहरी
डुलविति नाजुक सुसुम वल्लरी
किती सावल्या सुंख भारी
पिप्पलपादप- पर्णे सारीं
दवबिंदूंचो पखरण करिता

भयाण तेथे प्रस्तर कारा
उंच कितितरी एक मनोरा
फुलवल्लींनी येउनि बहरा
मुकुट अर्पिला ज्याच्या शिखरा
' सुम-स्तंभ ' हा बोले जनता.

सुमस्तंभ तो दुरुनि जरि खरा
शापितेस तो तथापि कारा
ज्यांत एकटी ती सुकुमारा
खिन्न वावरे सदा अप्सरा
एकाकीपण तिजसि जाळितां

समीपच्या त्या रुंद पथांतुन
अश्वद्वय कधि नेई वाहन
वा सरितेच्या संथ जलांतुन
शिडें नेती नौका ओढुन
धुक्यांत लपतां पुरी ' रम्यता '

परी शापिता कुणा दिसेना
गवाक्षांत तिज कुणी बघेना
कुब्जा, रंभा कुणा ज्ञात ना
उत्सुकताही कुणा छळीना
उरोज भिजवित बसे शापिता

शुक्रतारका क्षितिज उजळिता
कधी प्रवासी जातां येतां
उदास गायन दुरुनि ऐकतां
क्षणभर थांबुनि करितो चिंता
-' कोण असावी द्वीपीं वनिता ! '

आणि केधवा विधु वर्टोळा
उदयाचलिं जधि पिवळा पिवळा
प्रेमाग्नीने कुणी पोळला
म्हणे ऐकुनी त्या स्वरमाला
-' प्रेमावह्ला निश्चित वनिता ! '

-२-

तिथे कुजबुज कुणि रात्रंदिन
कानि तियच्या -" होतां गुंफुन
तव सुममाला स्वर्गी नहन
शापमुक्त तुज !-" चमत्कार पण
भार सुमांचा सदा वाढता !

विविध सुमांची माला गुंफित
प्रस्तर कारा भीषण घुमवित
स्वरमालांनी केव्हा स्फुंदत
अश्रूंनी निज उरोज भिजवित
सदा कार्यरत बसे शापिता

तिथे कुजबुजे कुणि रात्रंदिन
कानि तियेच्या- " गवाक्षिं येउन
जगताचें जर घेशिल दर्शन
घडेल कांही क्षणीं विलक्षण
होशिल नंतर अधिक दुःखिता !"

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समोर तीच्या दर्पण सुंदर
लोचनापरी तिच्याच निळसर
विशाल आणिक अती मनोहर
जयांत बिंबे जग जें बाहिर
आणि गवाक्षहि आणि शापिता

करुद्ध भोवरा सरितेमधला
नभःप्रांत वा लाल जाहला
अथवा वणवा दूर भडकला
लखलखणाऱ्या तारामाला
दर्पणिं बिंबत बघे शापिता

मेणा किंवा कधीं यति कुणी
केव्हा कुता केव्हा ध्वाजनी
वृद्धा केव्हा कांघ वा रमणी
गोप कधवा अथवा कुरणीं
दर्पणं बिंबत बघे शापिता

कधीं नृपाची जातां स्वारी
चीत्कारित जशी तुतारी
सतत नादतां कर्कश भेरी
जाधि कालाहत जाधि ललकारी
सत्वर झाकित श्रवण शापिता

मध्यरात्रिच्या गाढ तमांतुन
अनेक दिवट्या केव्हा घेउन
शव एखादें नतीं जाधि जन
बघे शापिता झाकित लोचन
शवयात्रा ती अवचित दिसतां

आणि कधीं त्या निळ्या दर्पणीं
नौकेमध्ये दृढालिंगनीं
चुंबन देतां कुणास कोणी
बघे शापिता अपुल्या नयनीं
अधिकच पाणी बघतां बघतां

—३—

ऊन कोंवळें कांचनवर्णी
पडलें होतें हिरव्या कुरणीं
चमकत होती आणि वाहिनी
ऐशा समयीं द्वीपिं दर्पणीं
बिंबे योद्धा ‘ त्रस्त-त्राता ’

हयारूढ तो अजिन रणमणी
अधरां शिणवित रणगीतांनी
वाकुन किंचित् निराखित नलिनी
सत्वर, उत्सुक जात पथांतुनि
धुक्यांत लपतां दूर ‘ रम्यता ’

कवच तयाचें दिपवी लोचन
शिरस्त्राणही सतेज होउन
पाठीवरची भव्य ढाल पण
पंचनेत्र ती अतिशय चमकुन
कनकशृंगही लख्ख उजळतां

आषाढाचें खड्गच निस्तुल
प्रखर वन्हि वा यज्ञवेदितील
तुटलेला जणुं तारा उज्वल
कटाक्ष अथवा तिचाच चंचल
दर्पणिं बिंबे त्रस्त-त्राता,

वक्ष तियेचें जैसें उन्नत
मस्तक त्याचें तसेंच बिंबत
वक्ष तियेचें जैसें विस्तृत
भाल तयाचें तसेंच बिंबन;
पुरी बावरे द्वीपिं शापिता !

रास सुमांची तुडवित आली
तोडुनि माला हातांमधली
गवाक्षाकडे ‘ शापिता ’ खुळी,
हृदयमूर्ति ती तिने पाहिली
सत्यसृष्टिही पुढति वाकतां

कमलपुंज तें तिने पाहिलें
मेघ आणखी रंगें नटलें
कांचनवर्णी ऊन कोवळें
रमणीवल्लभ नौकेमधलें
धुक्यांतील ती पुरी ‘ रम्यता ’

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होउं लागला ध्वनी भयंकर
कंपित झाले कारा-प्रस्तर
सुमनें पडलीं काळीं ठिक्कर
ठिकऱ्या झाला दर्पण सुंदर
बाहिर धावत येइ ' शापिता '

–४–

पूर्वदिशेतुन उठलें वादळ
नभःपटावर पसरे कज्जल
सरितेचें जल घाली गोंधळ
लवे दामिनी अविरत उज्ज्वल
प्रलयकाल ये भासे जगता

कोसळला तो भव्य मनोरा
येइ शापिता सोडुनि कारा
स्फुंदत गाठी नदी किनारा
जिथे बघे ती आणि अप्सरा
नौका कुठली डोलत असतां

तींत शापिता बसतां जाउन
गूढ शक्ति ने तिज गति देउन
सरितेमधल्या कल्लोळांतुन
तांडवरत त्या जलधारांतुन
जिकडे होती पुरी ' रम्यभा '

वसन तियेचें उडवी वारा
ताडिति तिजला निष्ठुर धारा
जाळित सुटतां तेज अंबरा
दीपावे किति ती सुकुमारा
नभोदुंदुभी देइ बधिरता

नौका गाठी पुरी ' रम्यभा '
कलेवर बघे अवघी जनता
लावण्याने स्तंभित होतां
किति उत्सुकता ' कोण देवता ! '
नभिं रव उमटत तोंच 'शा-पि-ता !'

परी कशास्तव कोणी दिधला
कुणा न कळलें शाप तो तिला
' भ्रस्त-भ्राता ' तथापि वदला
"–कुणी पापिणी असेल, असला
मुखविधु निर्मल जरी पाहतां !–"

—द. चिं. सोमण

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुकाराम जयराम केदार

द. वा. महाजन, बी. ए.

● नागपुरचे विख्यात नागरिक डॉ. तु. ज. केदार हे पहिल्या प्रतीचे कायदेपंडित व राजकारणपटु म्हणून सर्वांस ठाऊकच आहेत. पण ते नाट्यशास्त्र व वेदवाङ्मय यांचेहि गाढे अभ्यासक आहेत, हें किती जणांस विदित असेल ? अशा या अष्टपैलू थोर गृहस्थाचा अल्प परिचय रा. महाजन यांनी या लेखांत करून दिलेला आहे.

* * *

कांही वर्षांपूर्वीची गोष्ट. यवतमाळ येथे अबकारी खात्यांतील एका बड्या अधिकाऱ्यावर फौजदारी खटला सुरूं होता. खटल्यांत एका 'आय्. सी. एस्.' ची साक्ष व्हावयाची होती. आरोपीतर्फे रा. केदार हे त्या 'आय्. सी. एस्.' ची उलटतपासणी करणार होते. सदर 'आय्. सी. एस्' अधिकारी न्यायालयांत येतांच साक्षीदाराच्या ठरलेल्या जागेकडे न जातां न्यायाधिशाजवळच्या खुर्चीवर जाऊन विराजमान झाले ! रा. केदार यांनी लगेच या गोष्टीस हरकत घेऊन त्या 'आय्. सी. एस्.' अधिकाऱ्यास साक्षीदाराच्या जागेकडे जावयास लावले व त्याची ऐट पूर्णपणें जिरविली ! केदारांची लढाऊवृत्ति–विशेषतः त्यांचा नागपुरी धसमुसळेपणा–या प्रसंगाने सर्वांच्या चांगलाच निदर्शनास आला !

रा. केदार यांचा जन्म इ. स. १८८६ मध्ये 'पराशर ब्राह्मण' कुळांत झाला. त्यांचे बंधु वऱ्हाडांत वणी तालुक्यांतील एका खेड्यामध्यें शेती करून राहात असत. केदारांचे बालपण कांहीसें कष्टांतच गेलें. त्यांचें आरंभीचें शिक्षण वर्धा येथे झालें. त्यांना लहानपणापासूनच संस्कृत भाषेची फार गोडी होती. शाळा कॉलेजांत त्यांचा हा विषय नेहमींच तयार असें. इंग्रजी भाषेवरहि त्यांचें उत्तम प्रभुत्व होतें. १९०२ मध्ये ते मॅट्रिकच्या परीक्षेंत चांगल्या प्रकारें उत्तीर्ण होऊन त्यांना संस्कृतचे राजनांदगांवचें पहिलें बक्षीस मिळालें. पुढे ते कॉलेजांत जाऊन बी. ए. ची परीक्षाहि फार यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाले. कॉलेजांत असतांना त्यांचा संस्कृतचा व्यासंग वाढत जाऊन त्यांची कवि–कुल–गुरु कालिदास याजवर दृढभक्ती जडली, ती कायमचीच. कालीदासाच्या काव्य-नाटकांतील बहुतेक भाग केदार यांस अजूनहि मुखोद्गत आहे. यानंतर कायद्याची परीक्षा देउन त्यांनी वकिलीच्या धंद्यांत पदार्पण केलें.

केदार हे कॉलेजांत शिकत असतांना लो. ना. अणे, न्या. मू. पुराणिक प्रभृति प्रांतांतील थोर थोर मंडळी त्यांच्या आगे मागे होती. सुप्रसिद्ध पुढारी कै. बॅरि. अभ्यंकर यांच्याशीं त्यांचा विशेष संबंध आला. अभ्यंकरांशी केदारांचे सार्वजनिक आयुष्यांत फारसे सूत जमलें नसलें, तथापि अभ्यंकरांविषयीं केदार हे नेहमीच आदराने बोलतात. समकालिनांपैकी दारव्हा येथील वकील कै. डाऊ यांच्या संस्कृत भाषेंतील प्राविण्याबद्दल तें अत्यादरानें बोलत असतात.

वकिलीच्या धंद्यांत रा. केदार यांस अनन्यसाधारण यश आलें. फौजदारी वकील या नात्याने त्यांची तुलना फक्त कै. बॅरि. अभ्यंकर यांच्याशीच होऊं शकते. दोघेहि बुद्धिमान्, दोघांचेहि इंग्रजी वक्तृत्व ठसकेदार, आणि, बेडरपणांत तर अभ्यंकर उजवे की केदार उजवे, असाच प्रश्न एखाद्यास पडावयाचा ! दुर्दैवाने अभ्यंकर लौकरच कालवश झाले. आता त्यांच्या पश्चात् फौजदारी वकिलांचे मुगुटमणी म्हणून केदारांचेच 'एकछत्री साम्राज्य' प्रांतांत चालू आहे ! अर्थात् वकिलांच्या धंद्यात केदार हे खोऱ्याने पैसे ओढीत असल्यास त्यांत नवल तें कोणतें !

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कायदेपंडितांत केदारांना विशिष्ट स्थान प्राप्त होण्यास सुप्रसिद्ध ' रियासत ' खटला कारणीभूत झाला. या खटल्यांत डॉ. सप्रू यांच्या सारखे अखिल भारतीय कीर्तीचे मोठमोठे कायदेपंडित काम चालवीत होते, तरी देखील त्यांत रा. केदार यांचें तेज झळाळून दिसलेंच; ही एकच गोष्ट त्यांच्या कायद्यांतील नैपुण्याची साक्ष देण्यास पुरेशी आहे. अलीकडे खूप गाजलेल्या ' चिमूर ' खटल्यांतहि केदारांनी उदंड लौकिक प्राप्त करून घेतला. चिमूरच्या त्या हतभागी ' फाशीवाल्यां'ना मृत्यूच्या जबड्यांतून ओढून काढण्याचें बरेंच श्रेय केदार यांजकडे जातें !

केदार काम करीत असलेल्या खटल्यांत विरुद्ध बाजूचा साक्षीदार होण्याचा प्रसंग येणें म्हणजे महान् आपत्तीच होय ! त्या साक्षीदाराला केदारांनी पूर्णपणें फजित केलेंच म्हणून समजावें ! खुद्द न्यायाधिशांशीहि ते कायद्याच्या कक्षेंत राहून दोन हात करण्यास मागे-पुढे पाहात नाहीत ! तात्पर्य, वकील या नात्याने त्यांचा वचक जबर आहे.

रा. केदार यांस राजकारणाची प्रथमपासून गोडी होती. यामुळे धंद्यांत थोडाबहुत जम बसतांच ते राजकारणाच्या आखाड्यांत उतरले. आरंभीं ते ' ब्राह्मणेतर पक्षांत ' सामील झाले. पण त्या पक्षांतील राजकीय डावपेच मनापासून न आवडल्यामुळे ते पुढे काँग्रेसला जाऊन मिळाले. परंतु काँग्रेस ही कितीहि मोठी संस्था असली तथापि तिचा काटेरी लगाम स्वतंत्र बुद्धीच्या व्यक्तींना जाचक झाल्यावाचून सहसा राहात नाही, हा अनुभव आहे आणि त्याला रा. केदार हे अपवाद नव्हते ! ते मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळाचे कैक वर्षे सभासद होते व कांहीं काळ तर त्यांनी मंत्रिपदहि विभूषित केलें होतें. केदार हे कायदेमंडळाचे सभासद असतांना त्यांनी केलेलीं कांहीं भाषणें खूपच गाजलीं. उदाहरणादाखल १९३९ च्या मार्च महिन्यांतील कायदेमंडळाच्या बैठकींत केदारांनी तेव्हांच्या मंत्रिमंडळावर चढविलेला हल्ला पाहावा. " आम्ही अन्न मागतों, पण तुम्ही अन्न न देतां ' दारू पिऊं नका ' म्हणून सांगतां ! "—असें केदारांनी मंत्रिमंडळाला स्वच्छ बजावून व करवाढीचा सणसणीत निषेध केला ! ×

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनहि केदारांनी काम केलें आहे. त्यांनी कुलगुरु असतांना विद्यापीठांत पुष्कळच सुधारणा केल्या. हैद्राबादच्या वंदेमातरम् विद्यार्थ्यांच्या पुन्हापरीक्षा घेण्यांत त्यांनी जें धैर्य दाखविलें, त्याची फार वाहवा झाली.

नागपूर विद्यापीठाकडून केदारांना ' डॉक्टर ' ही पदवी मिळालेली आहे.

वकिलीचा व्यवसाय व राजकारण या दोन उद्योगांत आयुष्य घालविणारे डॉ. केदार गाढे व्यासंगी आहेत, हें कळून कुणासहि आश्चर्यच वाटेल ! हा व्यासंग करण्यास त्यांना फुरसत तरी कशी मिळते, असेंहि एखाद्यास वाटेल ! पण दिवसाचें सारें कामकाज आटोपल्यानंतर डॉ. केदार हे रात्रीचा वेळ नाट्यवाङ्मय व नाट्यशास्त्र आणि वेदवाङ्मय यांचें अध्ययन करण्यांत घालवितात; इतकेंच नव्हे, तर केव्हा केव्हा ते अखोचन जागरणहि करतात, ही वस्तुस्थिति आहे. संस्कृत व युरोपीय भाषांतील नाट्याचा केदारांनी सखोल व्यासंग केलेला आहे. महाराष्ट्र–नाट्य-संमेलनाच्या नागपूरच्या अधिवेशनाचें डॉ. केदार स्वागताध्यक्ष होते. त्याप्रसंगींचें त्यांचें भाषण वाचून पाहावें, म्हणजे नाट्यविषयावर त्यांचा केवढा अधिकार आहे, हें निदर्शनास येईल. +

कालिदासावर तर त्यांचा विशेषच भर आहे– ' Kalidas-His date and birth-place ' हा त्यांचा प्रबंध त्यांच्या विद्वत्तेची मूर्त पताकाच होय. कालिदास हा इ. स. पूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला व माळवा प्रांत हीच त्याची जन्मभूमि होय, हा मुद्दा या प्रबंधांत त्यांनी मांडलेला आहे.

अलीकडे डॉ. केदार ऋग्वेदाकडे वळले आहेत. ऋग्वेदावर ते इंग्रजी भाषेमध्ये एक प्रदीर्घ ग्रंथ लिहीत असून त्यापैकी एक भाग The Veda-

× ' महाराष्ट्र ' चा २२-३-३९ चा अंक पाहा.

\+ ' महाराष्ट्र ' चा ता. १५-१-३९ चा अंक पाहा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

sthan or the Ancient home of the Indo-Aryans' या मथळयाखाली नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ पुरा होऊन बाहेर पडल्यानंतर तज्ज्ञांकडून त्याची चिकित्सा होईलच परंतु या ग्रंथामुळे लो. "टिळक-प्रभृति वैदिक पंडितांच्या श्रेणींत डॉ. केदार यांस कायमचें स्थान मिळेल, एवढें मात्र निश्चित. 'Hidu law' वर आदर्शभूत ग्रंथ लिहिण्याचाहि त्यांचा संकल्प आहे.

डॉ. केदार यांचें खाजगी आयुष्य अत्यंत सुखाचें आहे. त्यांच्या पत्नि आदर्श गृहिणी असून त्यांचे मुलगेहि फार हुषार आहेत. त्यांपैकी एक मुलगा एंजिनिअर, दुसरा बॅरिस्टर, तर तिसरा 'कर्नल' असून चवथा कॉलेजांत शिकत आहे. डॉ. केदार हे सुधारणाप्रिय असल्यामुळे त्यांनी आपल्या मुलांचे मिश्र जातींत विवाह केले आहेत. जेवतांना घरांतील सर्व स्त्री-पुरुष टेबलाशीं एकत्र बसून काव्य-शास्त्र-विनोदांत भाग घेतात.

केदारांची 'ठोशास ठोसा' देण्याची प्रवृत्ती पुढील गोष्टीवरून दिसेल: नागपूर हायकोर्टाचे एक युरोपीय न्यायमूर्ति डॉ. केदार यांचें भाषण चालू असतां त्यांजकडे मुद्दाम दुर्लक्ष करून कागदपत्रांकडे पाहत असत व तद्द्वारां केदारांची मानखंडना करीत असत! याचा वचपा घेतल्या-खेरीज केदार कसे राहतील? १९४२ मध्ये त्यांना 'डॉक्टरेट' पदवी प्राप्त झाली, त्यावेळचा समारंभ चालू असतां केदारांनी प्रथम गव्हर्नरशीं हस्तांदोलन केलें व त्यानंतर दुसऱ्या एका न्याय-मूर्तीशीं हस्तांदोलन केलें. तिसऱ्या खुर्चीवर उपरोक्त गोरे न्यायमूर्ति बसले होते, त्यांना केदारांनी अजिबात वगळले व त्यांच्या पलीकडील खुर्चीवर बसलेल्या निराळ्याच गृहस्थाशीं हस्तांदोलन केलें! अशा रीतीनें त्यांनी त्या साहेबबहादुरांस आपलें 'नागपुरी पाणी' दाखविलें!

याप्रमाणें मुद्दाम 'खोडी' करणाऱ्या व्यक्तिशीं डॉ. केदार हे 'जशास तसें' या न्यायानें वागत असले, तथापि स्वभावानें ते फार प्रेमळ व उदार आहेत. त्यांच्याबद्दल लांबून गैरसमज बाळगणारी व्यक्ति त्यांच्या सहवासांत आल्यानंतर त्यांच्या चाहत्यांपैकी एक होते, या एकाच उदाहरणावरून त्यांच्या उमदेपणाची कुणासहि कल्पना येईल!

• • •

आधुनिक कवितेच्या निमित्ताने

लेखांक २ रा

प्रा.—पुरुषोत्तम शिवराव रेगे,
बी. एस्‌ सी. (लंडन)

● प्रा. रेगे यांनी आधुनिक कवितेसंबंधीचे आपले विचार आणखी कांही लेखांक लिहून मांडण्याचे ठरविलें आहे. त्याप्रमाणें आज त्यांच्या त्या संकल्पित लेखमालेचा दुसरा हप्ता प्रसिद्ध होत आहे. 'जीवननिष्ठ' म्हणविणारे कवि एका अर्थी 'लेबलवादी' कसे होऊं लागतात, हा मुद्दा या लेखांकांत प्रामुख्याने मांडलेला आहे.

• • •

कवीने आपली भूमिका ओळखली नाही की, कसे घोटाळे होतात, याचें थोडेसें दिग्दर्शन मराठी कवितेंतील मुख्य प्रवृत्ती दाखवून मीं गेल्या लेखांकांत केलें. कवि हा भाटहि नाही आणि प्रेषितहि नाहीं; तो एक अत्यंत आत्मनिष्ठ असा कलावंत आहे. परंतु नेमकें हेंच

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विसरल्यामुळे कवितेबद्दल भलत्याच अपेक्षा आणि त्या अपेक्षा पुऱ्या करण्यासाठी स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव नसलेल्या कवींकडून केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या कसरती यांचा गोंधळ चाललेला दिसून येतो. प्रस्तुत लेखांकांत मी याविषयीं थोडें लिहिणार आहे.

कलेसंबंधीं बहुतेक सर्व वाद मला तरी शुष्क वाटतात. कला ही व्यक्तिनिष्ठ किंवा जीवननिष्ठ, वास्तववादी की पलायनवादी, कालातीत की कालबद्ध…इत्यादि कितीतरी प्रश्न उपस्थित केले जातात. या सर्व वादांच्या मुळाशीं ज्याला समाजशास्त्री इंग्रजींत ' ॲंबिव्हॅलंट (ambivalent) ॲटिट्यूड ' म्हणतात, ती असते, असें मला वाटतें. या ॲटिट्यूड किंवा प्रवृत्तीमध्ये दोन परस्परविरोधी प्रवृत्तींचा समावेश झालेला असतो. प्राथमिक (Primitive) समाजांमध्ये ' टॅबू ' (taboo) ची हीच उपपत्ति लावण्यांत येते. जी गोष्ट किंवा वस्तु ' टॅबू ' असेल, तिच्यासंबंधी आकर्षणहि वाटतें आणि तिच्यापासून परावृत्तहि व्हावें, हीहि भावना असते. पवित्र वस्तु, दुसऱ्याची मालमत्ता, कुटुंबांतील निषिद्ध संभोग यांच्या बाबतींत वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्य साधण्यासाठीं ' टॅबू 'चा उपयोग करण्यांत येतो. कलेसंबंधी हे वाद लढविणाऱ्या कलाकाराच्या मनांतहि अशाच विरोधी प्रवृत्तींचा झगडा चालू असतो. एका बाजूने त्याला वाटत असतें की, आपण अगदी आर्ष कवींच्या तोडीचे. (येथे ' कवि ' या शब्दाचा वेदकालीन ' द्रष्टा ' हा अर्थ गृहित धरायचा.) गगनाला गवसणी घालणारे, दिक्कालांच्या पलीकडे पाहणारे, चराचराचे व्यापार सर्वथैव समजणारे असे आपणच. आणि मग तो आपल्या प्रतिभाविलासाची खैरात करूं लागतो. परंतु दुसऱ्या बाजूने त्याला नेहमी अशी टोचणी असते की, आपलें कोठे तरी चुकतें आहे, आपल्या भोवतालचें जीवन……जें अथांग आहे, समृद्ध आहे, सुखदुःखसंमिश्र आहे, आणखीहि पुष्कळ कांहीं आहे……त्यांत आपलें स्थान कोणतें ! आपला वाटा कोणता ! आपणांत कांहीं तरी कमी आहे, अशी त्याची भावना होते आणि मग तो ' जीवननिष्ठ ' कलेचा पुकार करूं लागतो; क्रांतीची भाषा बोलतो; अंगार, अश्रू, रक्त, ठिणग्या-यांचा खच पाडूं लागतो. कारखान्यांतील मजूर, उन्हांत काम करणारी वडारीण, जयप्रकाश नारायण, इतकेंच काय, पण लोकल बोर्डाचा एकादा साधारण सभासद हे आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत, अशी त्याची भावना होते. त्यांचें जीवन किती विशाल आणि त्या मानाने आपलें किती तोकडें, याची त्याला हळहळ वाटते. तो कविता लिहितो, तें केवळ एक साधन म्हणून. त्याचा खरा रोख क्रांतीकडे, जीवनदर्शनाकडे असतो. अशा या दोन प्रवृत्ती असतात. जोंपर्यंत पहिली आर्ष दृष्टि असते, तोंपर्यंत निदान उत्तम काव्य जरी तो प्रसवूं शकला नाही, तरी आपलें व्यक्तिमत्त्व–'आपले'पणा—तो टिकवूं शकतो. मात्र दुसऱ्या प्रवृत्तीचा पगडा सुरू झाला की, धड काव्यहि नाही आणि व्यक्तिमत्त्वहि नाही, अशी त्याची केविलवाणी स्थिति होते. प्रत्येक तथाकथित 'जीवननिष्ठ ', क्रांतिवादी कवीला मला तरी असें सांगावेंसें वाटतें की, " बाबा रे, तुला जर वाटतें, तर तू खुशाल स्वातंत्र्यसंगरांत, क्रांतीच्या यज्ञकुंडांत, मानवतेच्या बंडांत उडी टाक. पण त्याविषयीं अशी आडवळणाची भाषा बोलूं नकोस, आणि आपण अशी भाषा बोलतों, म्हणून श्रेष्ठ कवि आहोंत, अशी बढाई मारूं नकोस ! " आपण एक साधे कारागीर आहोंत, या समजुतीने जो प्रामाणिकपणाने काव्य लिहील, त्याचेंच काव्य टिकून राहील. प्रचारकी आवेश थोडी चमत्कृति करून दाखवलि, पण असलें काव्य टिकणार नाही. जगांतील प्रत्येक भाषेंतील काव्याचा इतिहास हेंच सांगतो. तेव्हा कवीने कांहींहि व्हावें, पण ' लेबलवादी ' कवि होऊं नये !

आपण जीवनदर्शनांत कमी पडतों, ही जाणीव आजकालच्या कवींतहि नव्हे, तर टीकाकारांतहि बळावत चालली आहे. कोणी काय लिहिलें आहे, यापेक्षा काय लिहिलें नाही,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याची विशेष चिकित्सा होते. एकाद्या कवीचें उत्तम प्रेमगीत वाचलें की, यांना वाटतें कीं, आपणांला हें आवडलें, यांतच कांही तरी चूक झाली. आजचा काळ क्रांतीचा आहे. या बेट्याने क्रांतीसंबंधी कांही लिहिलें आहे की नाही! नसल्यास त्याला बाजूला सारा! यांना प्रिय असलेल्या क्रांतिवादी कवींनी रिक्रूटभरतीचीं गीतें लिहिलीं आणि ४२ सालच्या क्रांतिचेंहि पवाडे गायिले आणि लवकरच नव्या 'हिंदु' राष्ट्राचीं कवनें गायलाहि हे कमी करणार नाहीत! कांहीजण इतका वेळपर्यंत आपल्या मानाच्या सरकारी नोकऱ्या सांभाळून होते; त्यांनाहि आता एकदम झटका आल्यासारखा क्रांतीचा साक्षात्कार झालेला दिसत आहे! कांहींनी आपल्या वडिलार्जित इनामदारीवर जगून समाजवादाचे सूर आळवले. टीकाकार काव्यांत आणि एकंदर ललितलेखनांत अद्ययावत्पणा अपेक्षितात, म्हणून हेहि अणु-गोलाचे, साम्राज्यशाहीच्या अस्ताचे, दलितांच्या पिळवणुकीचे पडसाद उमटवूं पाहतात! 'कलेसाठी कला' या विचारसरणीचा केवळ शाब्दिक अर्थ घेऊन आणि नुसत्या लेखणी झिणविणाऱ्या लेखकांना दाखला देऊन 'जीवनासाठी कला,' 'भाकरीसाठी कला,' 'देशासाठी कला,' 'पक्षासाठी कला,' 'नोकरीसाठी कला,' 'टीकाकारासाठी कला,' (हे सर्व पर्याय खरोखर एकच आहेत.)–वगैरे पुकारवाक्यें (Slogans) ओरडत जेव्हा हे व त्यांच्या जातीचे टीकाकार पुढे सरसावतात, तेव्हा एक मोठा अन्याय होत आहे, असें मला नेहमी वाटतें. 'कलेसाठी कला' याचा साधा अर्थ असा की, कलावंत हा एका कलेखेरीज कोणाचीच कदर करीत नसतो. याचा अर्थ असा नव्हे की, तो जीवनाला पारखा झालेला असतो. त्याच्यापाशीं कला आणि जीवन हे दोन भेदच नसतात. त्याची कला हेंच त्याचें जीवन असतें आणि जीवन हीच त्याची कला असते. त्याला तुमच्या रोजच्या जीवनाचे नियम लावूं नका. रुपये-आणे-पैंमध्ये त्याची किंमत करून उपयुक्ततेच्या निकषावर त्याचें मूल्यमापन करूं नका. 'कलेसाठी कला' या दंडकाचा मी तरी इतकाच अर्थ करतों; आणि, हाच अर्थ या दंडकांत ग्राह्य आहे. एका दृष्टीने पाहिलें, तर हाच अर्थ अधिक आदर्श-वादी आहे. 'जीवनासाठी कला' हा पुकार ऐकला की, कलेच्या शिळ्या कढीला ऊत आण-ण्यासाठी हा खटाटोप असतो, हें पक्कें लक्षांत ठेवावें. केवळ जीवनासाठीच जर कला हवी असेल, तर असल्या जीवनाचें कलेवाचून कांही फारसें अडणार नाही. जातिवंत कला ही स्वयंसिद्ध असते; माझें मूल्यमापन करा, असें सांगायला ती अजीजीने केव्हाच पुढे होणार नाही. कला ही व्यावहारिक दृष्ट्या केव्हाच उपयोगी नसणार; मग तुमचें जीवन कितीहि व्यापक असो!

याच वादाचा दुसरा एक फाटा अधून मधून डोकावतो. आणि, तो म्हणजे महाकवींच्या अभा-बाबद्दल वेळींअवेळीं होणारी तक्रार. या वादांत 'महाकवि' या शब्दांतील 'महा' या विशेषणावर अधिक जोर असतो; कवित्व गृहित धरलेलें असतें किंवा गौण तरी समजलें जातें. कोणी काय लिहिलें आहे, यापेक्षा किती लिहिलें आहे, हें आधी तपासलें जातें. आणि, सकृद्दर्शनीं काव्याच्या खोलीपेक्षा लांबीरुंदीच डोळ्यांत जास्त भरत असल्यामुळे यांतून काय निष्पन्न होतें, तें मुद्दाम सांगायला नको. हाहि वाद मला शुष्कच वाटतो. जेव्हा मुद्रणकला नव्हती, वाहतुकीचीं साधनें अपुरीं होतीं, लेखनाला लाग-णाऱ्या साहित्याची कमतरता होती, तेव्हा सौकर्य आणि आटोपशीरपणा या दोन्ही गरजांमुळे, वाग्-विनिमय पद्यांतूनच होणें साहजिक आणि इष्ट होतें. ज्योतिष, आयुर्वेद, गणित यांवरचे ग्रंथहि पद्यांत लिहिले जात असत. ज्यांना महाकाव्यें म्हणून संबोधिलें जातें, तीं प्रायः इतिहास-विषयकच होत. रामायण, महाभारत, इलियड–इत्यादि महाकाव्यें अजूनहि आपल्या मनाची पकड घेऊं शकतात, याचें मुख्य कारण म्हणजे त्यांत ग्रथित झालेल्या सांस्कृतिक परंपरेचें आपण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वारसदार असतों. त्यांतील घटना आपल्या नित्य परिचयाच्या झालेल्या असतात. या महाकाव्यांत अधूनमधून काव्यमय मजकूर असतो, पण मुख्यत: कथन हाच त्यांचा आत्मा असतो. त्यांना काव्य म्हणायचें, तें केवळ व्यापक अर्थानें. आता, गंमत अशी असते की प्रत्यक्ष हीं काव्यें संशोधक आणि वेठीला धरलेले विद्यार्थी यांखेरीज बहुतेक कोणी मूळांतून वाचीत नाही. अशा काव्यांचीं भाषांतरें, रूपांतरें, तर्जुमेच बहुजनसमाजाच्या वाचनांत येतात. आणि, समाज हीं सर्व वाचतो, कारण त्यांत त्याला त्याचें सांस्कृतिक दर्शन होतें. आज असें व्यापक सांस्कृतिक दर्शन 'पद्य' मय ग्रंथांतून करून घेण्याची आवश्यकता उरलेली नाही, कारण दुसरीं कितीतरी अधिक प्रभावी साधनें उपलब्ध आहेत. आजचा जिज्ञासू टॉइनबीचें 'स्टडी ऑफ हिस्ट्री' किंवा वेस्टमार्केचें 'डेव्हलपमेंट ऑफ मॉरल आयडिआज' वाचील. त्याची धाव जरा कमी असली, तर गॉल्सवर्दीचें 'फोर्साइट सागा' किंवा सॉमरसेट मॉमचें 'दे रेझर्स एज' वाचील; हरिभाऊ आपट्यांची 'मी' किंवा लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रें' वाचील; वरेरकरांची 'विधवा कुमारी' किंवा केतकरांची 'ब्राह्मण-कन्या' वाचील; वामन मल्हारांच्या 'स्मृति-लहरी' किंवा त्यांचीच 'इंदु काळे आणि सरला भोळे' वाचील. आणि, म्हणूनच महा-काव्याचा ध्यास घेतलेल्या टीकाकाराची फसगत होते. महाकाव्यें पद्यांत शोधण्या-ऐवजीं जर तो तीं गद्यांत शोधूं लागला, तर आजच्या इतकीं समृद्ध महाकाव्यें कोणत्याहि पूर्वीच्या युगांत त्याला सापडणार नाहीत.

गद्य आणि पद्य यांचे बदललेले संबंध लक्ष्यांत न घेतल्यामुळे हा महाकवींचा शोध असा अनाठायीं होतो. बहुजनसमाजासाठी जें सांगावयाचें, तें गद्यांतच सांगावें लागतें. भावना आणि विचार यांचा सैलपणें आणि स्वैरपणें गद्यांत जसा आविष्कार होऊं शकतो, तसा तो पद्यांत होत नाही. पद्य 'काव्य' या सदरांत जर मोडायला हवें असेल, तर भावनांची उंची, त्यांचा आविष्कार करण्याची धाटणी अगदी निराळीच असावी लागते. सध्याच्या युगांत विचारांच्या देवघेवीचें स्वरूप व क्षेत्र कितीतरी पटीनें वाढलें आहे. तेव्हा बहुजनसमाजाचा गद्याकडेच विशेष ओढा असणें साहजिक होय. मासिक उघडलें, तर तो आधी गोष्ट वाचील, कविता वाचणार नाही. कादंबरी किंवा कथा-संग्रह यांचेकडे तो जितका आकृष्ट होईल, तितका एकाद्या काव्यसंग्रहाकडे होणार नाही. यांत काव्या-कडे गौणपणा येतो, असें मात्र नाही. काव्याचें क्षेत्रच आजच्या युगांत आकुंचित झालें आहे. आणि, ही जाणीव झाल्यामुळेच की काय, ज्यांच्यांत खरी 'काव्यात्मता' नाही–म्हणजे कवीला अवश्य असणारी भावनाविष्काराची साक्षेपता नाही-ते कवी हळू हळू गद्याकडे ओढले जातात. काव्याचीं बंधनें त्यांच्या स्वभावाला मानवत नाहीत. आपल्याकडे काणेकरांचें उदाह-रण आहेच. आता कुसुमाग्रज आणि अनिलहि याच पथावर आहेत, असें दिसूं लागलें आहे. ही प्रवृत्ति वाईट आहे, असें म्हणण्याचा माझा हेतु नाही. मला फक्त हेंच दाखवायचें आहे की, चालू युगांत गद्यालाच विशेष महत्त्व आहे; आणि, ज्यांना विशेष असें कांही आवर्जून सांगा-यचें आहे, त्यांना गद्याचा आश्रय घेतल्यावाचून गत्यंतर नाही.

आधुनिक कवितेवर आणि कवींवर यामुळे एक मोठीच जबाबदारी पडली आहे. ती जबाब-दारी पार पाडण्यासाठी त्यांना आपल्या भूमिकेची योग्य जाणीव राहिली पाहिजे. त्यासाठी काय केलें पाहिजे, यावर पुन्हा एकदा केव्हा तरी लिहीन.

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुतांची 'स्वप्नसृष्टि'

श्रीराम अत्तरदे, एम्. ए.

लेखांक ३ रा

● प्रस्तुत लेखांकांत केशवसुतांच्या काव्यलेखनाचा 'पूर्वतयारीचा कालखंड' वर्णिला असून या कालखंडांत केशवसुत हे "समकालीन हिंदी राष्ट्रीयतेचे उद्गाते" होते, असें रा. अत्तरदे यांनी दाखविलें आहे.

* * *

पूर्वतयारीचा कालखंड

अनेक आधुनिक कवींप्रमाणे केशवसुतांवरहि आंग्ल वाङ्मयांतील भिन्नभिन्न संप्रदायांचे एकाच वेळेस संस्कार झाले होते, यांतील कांही संस्कार उत्तरोत्तर शबल होत जाऊन नष्ट झाले, तर कांही अखेरपर्यंत कायम राहिले. केशवसुतांचे बदलत्या एतद्देशीय समाजव्यवस्थेबाबतचे विचार अधिक प्रभावी ठरून पूर्वोक्त संस्कार गौण ठरले, हाच महाजनी-कुंटे व केशवसुत यांतील फरक होय. आंग्ल कवींचें अंधानुकरण करणाऱ्या कवींना केशवसुतांचें महत्त्व लाभणें अशक्य होतें. आता, प्रस्तुत कवीची समकालीन जमान्याबाबत कोणती भूमिका होती, व ती कोणत्या शब्दांत त्याने व्यक्त केली आहे, त्या व्यक्तीकरणांत कांही विशिष्ट शब्दांना वारंवार साभिप्राय महत्त्व कवीने दिलें आहे काय, असल्यास त्यांतून कवीच्या भूमिकेचा विकास वा ऱ्हास कस कसा प्रतिबिंबित होतो, हें आपण अगोदर पाहणें जरूरीचे आहे; कदाचित् त्यांतच त्याचें युगप्रतिनिधित्व गावण्याचा संभव आहे.

केशवसुतांनी वारंवार साभिप्राय योजिलेल्या शब्दांत दोन शब्द ठळकपणें अभ्यासकाच्या लक्ष्यांत आल्यावाचून राहात नाहीत; ते म्हणजे 'स्वर्ग' व 'सृष्टि.' या 'स्वर्ग' वा 'सृष्टि' शब्दांतच त्यांचें सर्व तत्त्वज्ञान सामावलेलें आढळेल. अर्थात् आरंभीं कवीला त्यांचे कोणते अर्थ अभिप्रेत होते, व त्या अर्थांत पुढे कमीअधिक भर पडत जाऊन कवीच्या भूमिकेचा विकास कसा झाला, हें पाहणें या ठिकाणीं प्रस्तुत आहे.

'सृष्टि' हा शब्द अगदी प्रथमच केशवसुतानी आपल्या 'आगबोटीच्या काठाशीं समुद्राच्या शोभेकडे पाहात उभ्या असलेल्या एका तरुणीस' या कवितेंत साभिप्राय योजिलेला असून त्यांच्या परिपोषांतच त्यांची 'स्वर्ग' विषयक आरंभींची कल्पना सूचित झालेली आहे. कवितेंतल्या तरुणीस ते 'सुता तूं सृष्टीची' म्हणतात. प्रचलित मानवी जीवनांतील दुःखें पाहून कवीला जगाचा वीट आला आहे; सरंजामदारी समाजव्यवस्थेंत होणारे अन्याय व कनिष्ठांची पायमल्ली हीं त्याला उघड उघड दिसत आहेत; परंतु बंडाचा आदेश देण्याऐवजी कवि म्हणतात—

'मलाही या पृथ्वीवरिल गमतें गे जड जिणें !
इथे या दुःखांचें सतत मनुजांना दडपणें !
इथे न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो !
नरालागी येथे नरच चरणांहीं तुडवितो !'

याचें कारण मानव !

'स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरूं पाहत असे,
नराच्या ऐसा या कवण दुसरा मूर्ख गवसे ?'

भेदाभेदरहित व समानतेवर आधारलेलें निसर्गजीवन हाच 'सृष्टि' या शब्दाचा अर्थ या ठिकाणीं अभिप्रेत दिसतो. निसर्गपूजेच्या आंग्ल वाङ्मयांतील एका संप्रदायाचा हाच दृष्टिकोन होता. निसर्गजीवनाचा आदर्श पुढे ठेवून कवि

'जरी दुःखाचें हें निवळ अवघें सर्व जगणें,
तरी या देहाचा सुखदचि असे त्याग करणें !...'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशी आमना उराशीं बाळगतात. आगरकरादि सुधारकांचें 'बूर्ज्वा' तत्त्वज्ञान कवीने पचवण्यापूर्वी विद्यार्थीदशेंत इंग्रजींतील अद्भुतरम्यतावादी निसर्गप्रेमी कवींच्या काव्याच्या अध्ययनाने कवींचा हा दृष्टिकोन बनला असावा, कारण त्यांत प्रकट रीत्या जीवनपराङ्मुखता (Back to Nature) पुरस्कारिलेली असून पुढील 'बंडखोर' केशवसुतांचा या कवितेंत मागमूसहि नाही; म्हणून तिला अलिप्ततावादाचें (Escapism) स्वरूप आलेलें आहे. फ्रेंच लेखक रुसो याच्या प्रभावाने इंग्रजींत निसर्गप्रेमास बहर आला होता. वर्ड्स्वर्थ, कीट्स, शेली वगैरे कवींपासून विद्यार्थी केशवसुतांनी हें ऋण घेतलें असावें; कारण पुढे पुढे ही वृत्ति त्यांच्या काव्यांत तशीच राहिलेली आढळत नाही.

विशिष्ट आंग्लकविसंप्रदायाचें निसर्गप्रेम व जीवनपराङ्मुखता हीं दोन्ही केशवसुतांनी जशींच्या तशीं घेतलीं नव्हतीं. त्यांच्या भोंवतालच्या जीवनांत अर्थव्यवस्थेंतील बदलत्या मूल्यांमुळे ओघानेच सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे विविध प्रकारचीं आंदोलनें होत असल्यामुळे त्यांच्या जात्याच संस्कारक्षम मनाला त्या चळवळी स्पर्श करत्या झाल्या, म्हणूनच प्रस्तुत कवितेंत 'सृष्टी'बरोबरच त्यांनी जीवनपराङ्मुख दृष्टिकोनांतून का होईना, समकालीन जीवनाचें चित्रण केलें आहे.

'इथे न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो !
नरालागी येथे नरच चरणांहीं तुडवितो !'

हें तर खरेंच, तथापि साम्राज्यशाहींत पर्यवसान पावलेल्या पाश्चिमात्य भांडवलशाहीच्या आक्रमणास एकेक देश बळी पडल्याचा व पडत असल्याचा इतिहास कवींना दिसत होता (अर्थात् त्याची कारणमीमांसा 'मानवाचा अन्याय' या मोघम शब्दांतच कवींनी केली आहे), हें पुढील उद्गारांवरून दिसून येईल—

'कधी कोणी राष्ट्र प्रबल दुसऱ्याला बुडविण्या,
जहाजें मोठालीं करिल जरि गे सज्ज लढण्या···'

आणि स्वस्त श्रमशक्तीसाठी

'गुलामां आणाया निघतिल कुणी दुष्ट नर ते,
तरी त्यांचीं फोडूं अचुक खडकीं तीं गलबतें !'

समकालीन जीवनाचें हुबेहुब चित्रण असूनहि कवितेंतील मुख्य सूत्र जीवनपराङ्मुखतेचें असल्यामुळे यास अभावात्मक चित्रणच म्हणावें लागेल. जगांतील दुःखें व अन्याय पाहून कवींना देहत्यागाची बुद्धि होते; व 'सुता तूं सृष्टीची' अशा त्या तरुणीस ते म्हणतात,

'शिरीं त्या (स्वर्गींतील) मेरूच्या विलसत
असे नंदनवन,
अधस्तात् शोभे ती अमरनदि तद्बिंब धरुन;
वनीं त्या देवांच्या सह अमृत तें प्राशन करूं;
तशी रम्भासंगें चल ! सुरनदीमाजि विहरूं !'

'स्वयम्भू सृष्टीचे नियम सुधरूं पाहात असे'— हें मानवाच्या सर्व दुःखांचें कारण कवींनी दिलेलें आहे. देविप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या मागे आलेल्या उताऱ्यांवरून पाहतां, हें बालक क्षयरोगी होतें खरें, परंतु त्याची वाढहि अपरिहार्य होती, कारण जुन्या जमान्याहून तें अधिक सामर्थ्यशाली होतें.

जीवनपराङ्मुखता मराठी काव्यांत कांही नवीनच आली, अशांतला भाग नाही; तथापि केशवसुतांनी समकालीन समाजाचें केलेलें चित्रण हें लेंभे-मोगरे किंवा त्यांपूर्वीच्या कोणत्याहि मराठी कवीच्या काव्यांत आढळणें अशक्यच होतें; केशवसुतांनी तें केलें, म्हणून ते मोठे झाले. आगरकरांसारखे जाज्वल्य विचाराचे गुरु शाळेंत लाभल्याचाहि यांत थोडाफार वाटा असेलच. पूर्वसूरींहून वेगळ्या अशा आपल्या या वैशिष्ट्याची जाणीव झाल्यामुळेच केशवसुतांनी 'दुर्मुखलेला' या कवितेंत आत्मप्रौढीने युक्त असे बाणेदार उद्गार काढले आहेत.

'जे मुंग्या म्हणुनी मनीं समजशी या मंडळीभीतरी,
ते पक्षी उडतील हो उनि गुरो ! व्योमीं न जाणों वरी!
राखेचीं दिपळें म्हणून दिसती जीं तीं उद्या या जगा
भस्मीसात् करणार नाहित अशीं तुम्ही हमी द्याल-का ?'

आणखी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढे आहे सुंदर तो सदा सरसवाङ्‌निष्यन्द चोहीकडे.' पुढे गृहस्थाश्रमांत लिहिलेल्या 'आम्ही कोण!' या कवितेंत तर या आत्मप्रौढीला असमर्थनीय दर्पोक्तीचें स्वरूप आलेलें आढळतें.

जीवनपराङ्‌मुखता शिकवणाऱ्या आंग्ल निसर्ग-प्रेमाचे कवींवर दृढ संस्कार झालेले होते. तरीहि समकालाबद्दलच्या जागृतीच्या क्षणिक मानसिक अवस्थेंत ते शबल होत होते. स्थूलमानाने केशव-सुतांच्या कालखण्डांतलेच कै. कुंटे यांचें 'राजा शिवाजी' हें काव्य पूर्वेतिहासांत राष्ट्रीयतेची उभारी शोधणाऱ्या नव्या भांडवलदारीनियंत्रित मध्यमवर्गीयांच्या वैचारिक दिशेचें फळ होतें. शिवकालीन, किम्बहुना, सरंजामदारी अर्थ-व्यवस्थेच्या काळांतील, 'राष्ट्र' या शब्दाचा अर्थ व आधुनिक राष्ट्रीयता (Nationalism) यांचा काडीइतकाहि संबंध नाही. तरीहि, मागे सांगितल्याप्रमाणे, एतद्देशीय वर्धिष्णु भांडवल-शाहीपुढील निकडीच्या प्रश्नांमधून हा प्रकार उद्भवला होता. एकीकडे पाश्चिमात्य भांडवलशाहीशीं हात मिळविणें एतद्देशीय भांडवलदारांना भाग होतें, तर दुसरीकडे, स्वतःच्या भांडवलाच्या विकासासाठी त्यांच्याशीं प्रच्छन्न रीतीने लढणें आवश्यक होते. यासाठीं स्वकीय मध्यम वर्ग व श्रमजीवी कनिष्ठ वर्ग यांच्या साहाय्याचें त्यांना अगत्य होतेंच'परंतु या श्रमजीवि वर्गांत क्रांतिकारकत्वाचा प्रादुर्भाव होऊन त्याची ताकद वाढणें त्यांना नको होतें; किम्बहुना, या बाबतींत तरी तो वर्ग आपला अंकित राहील, अशीच खबरदारी त्यांना घ्यायची होती. मध्यमवर्ग वर्धिष्णु भाण्डवलदारीच्या वैचारिक भूमिकेवर आलेला होता. मध्यमवर्गाची कोणत्याहि काळांत अशीच भूमिका असते. स्वतःच्या भांडव-लदारी विकासासाठी एतद्देशीय भाण्डवलदारांच्या नेतृत्वाखाली मध्यमवर्ग राजकीय बन्धमोचनाचा पुरस्कार करूं लागला होता. अर्थात् सामान्य जनता, क्रांतिकारक संघटनायुगाच्या व औद्योगी-करणाच्या अभावामुळे, याच वर्गाच्या पाठीमागे जात होती. ब्रिटिश साम्राज्यशाहीला देखील वसाहतींतील या नव्या वर्धिष्णु वर्गाशीं समेट करणें भाग होतें. दशवार्षिक सुधारणा देऊन भाण्डवलदार व मध्यमवर्ग यांना खूष करून तिने तें कार्य पार पाडलें. सुधारणांनी भाण्डवलदार व मध्यमवर्ग यांचें समाधान होई, यावरून राष्ट्रीय चळवळीचा हा प्राथमिक कालखंड होता, असें म्हणावे लागेल. तथापि इनमिन् सुधारणा पदरांत पाडून घेण्यासाठी देखील सबंध देशाबद्दलची एक राजकीय भावना (जिला आधुनिक काळांत राष्ट्रीयता Nationalism म्हणतात) पेटवणें त्यांना आवश्यक होतें. या 'राष्ट्रीय भावने' चा पुरस्कार भारतीय भाषांतील केशवसुतांच्या समकालीन वाङ्मयांत आपणांला आढळेल. अर्थात् या वर्धिष्णु भांडवलदारीनियंत्रित सुधारणावादी राष्ट्रीयतेचा पगडा ज्यांच्यावर पूर्णपणें बसला नव्हता, पण राष्ट्रीयतेमुळे जे पुरेपूर भारले गेले होते, असे मध्यम व कनिष्ठ वर्गांतील अल्पसंख्य घटक देशाला स्वतंत्र करण्याच्या हेतूने एका धडा-डीच्या, पण कालमानाने चुकीच्या मार्गाकडे वळले. तो मार्ग म्हणजे दहशतवाद वा शेतक-ऱ्यांच्या बण्डाचा पुरस्कार. आधुनिक भारतीय क्रांतिकारक कामगारशेतकरी चळवळींच्या आरंभाचीहि पार्श्वभूमि म्हणून या मध्यमवर्गीय व इतरवर्गीय साहसी चळवळींचें महत्त्व आहे. पण बहुसंख्य मध्यमवर्ग (थोडक्यांत, बुद्धिवादी म्हणवणारा वर्ग) हा भांडवलदारीनियंत्रित सनद-शीर राजकारणाचा आधारस्तंभ बनला होता.

राष्ट्रीय चळवळीच्या या दोन्ही अंगांचें प्रति-बिंब केशवसुतांच्या कांही कवितांतून आढळेल. या नव्या राजकीय काळांत नव्या राष्ट्रीयतेच्या पुरस्कारार्थ सरंजामशाही युगांतील घटनांना अर्वा-चीन स्वरूप देण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांपैकीच 'राजा शिवाजी' सारखीं काव्यें होत, हें वर सांगितलेंच. चिंतामणि पेठकरांचें 'गंगावर्णन' हें काव्यसुद्धा समकालीन बदललेल्या मूल्यांतून पारखणें फार उपयुक्त ठरेल. या बदलत्या काळामुळे आंग्लानुकृत निसर्ग-प्रेमाचा केशवसुतांच्या मनावरील प्रभाव या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काळांत अधूनमधून तरी क्षणिक सनकेंत शबल होई व त्या जाज्वल्य क्षणीं त्यांच्या मुखांतून समकालीन युगाचें निदर्शक असे उद्गार कविता-बद्ध होत. राष्ट्रीय चळवळीचे दोन्ही प्रवाह मानसिक कलाप्रमाणे त्यांच्या कवितेंत व्यक्त झाले आहेत. 'एका भारतीयाचे उद्गार' ही कविता विचारांत घेण्यासारखी आहे. 'भारतीय', 'भारतीय राष्ट्र', 'भारतीय राजकारण', 'भारतीय संस्कृति' या गोष्टी या युगांतच पैदा झालेल्या होत्या. क्रांतिकारक चळवळींच्या विकसित स्वरूपांत निर्माण होणारे राष्ट्रगट-विषयक प्रश्न या काळांत अजिबात पुढे येणें शक्य नव्हतें. 'महाराष्ट्रीय' ही भूमिका वरचढ राहणें शक्य नव्हतें. भारतीय 'बूर्ज्वा' वर्गाचें हें युग असल्यानें वाङ्मयांतहि त्याच्याच वैचारिक व इतर वर्चस्वाचा पगडा दिसून येणें स्वाभाविक होतें. 'एका भारतीयाचे उद्गार' या कवितेंतील

'वल्लींनो! हीं सुबक सुमनें काय आम्हांस होत ?
युष्मद्गानें मधुर, खग हो! या जनां काय होत ?
आम्हां डोळे नमांत बघण्या पारतंत्र्यामुळें हो!
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळे हो!'

हे उद्गार व विशेषतः 'पारतंत्र्यामुळे हो' या शब्दांची साभिप्राय पुनरुक्ति, त्याचप्रमाणें, शेवटच्या कडव्यांतील

'देवा! केव्हा परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?
केव्हा आम्ही सुटुनि सहसा पंजरांतूनि, देवा,
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हा ?'

या ओळींतून घुमणारा राष्ट्रीयतेचा ध्यास, यामुळेच प्रस्तुत कवींचें प्रारंभींचें काव्य तोलाचें झालें आहे. यांतील 'वल्लींनो' या कडव्यांतील निसर्ग-विषयक दृष्टिकोन व इतर निसर्गप्रेमपर कविता यांमधील विसदृशता मोठी मनोरंजक आहे. (एवढें मात्र खरें कीं, वर उध्दृत केलेल्या कडव्यांतील 'राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हा ?' या ओळींतील 'फिरुनि' या शब्दांतहि वर सांगितलेला भूतकालविषयक दृष्टिकोन दिसून येतो.)

पण 'एका भारतीयाचे उद्गार' या कवितेंत कवींना जें सांगतां आलें नाही, तें त्यांनी 'गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' या कवितेंत सांगितलें आहे. ही कविता वाचतांना ब्रिटिशांच्या पूर्ण उच्चाटनाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचीं स्वप्नें पाहात व सनदशीर भांडवलदारी राजकारणाला कंटाळून क्रांतिकारकत्वाचा मागोवा घेत, लोकजागृतीसाठीं साहसी कृत्यें करायला तयार झालेल्या मध्यमवर्गीय दहशतवादी देश-भक्ताच्या गुप्त बैठकांची आठवण होते.—

'देशाविषयीं गोष्टी बोलत येथे
बसलों, विसरुनि कितीकदा निद्रेतें;
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हा,
अश्रूंमध्ये अश्रु गळाले तेव्हा'.

आणखी,

'या डोळ्यांनी पहाट ती बघण्याचें
असेल का हो नशिबीं दुर्दैव्यांचे ?
किंवा तीतें आणायाचें कांही
यत्न आमुच्या होतिल काय करांहीं?'

सन १८५७ पासून—किंबहुना, त्यापूर्वीहि—तों तहत १९३५ पर्यंत अशा तुरळक व संघटित प्रयत्नांची परंपरा देशांत होती. वर्गीय संघटनांचें कामगारक्रांतीचें प्रभावी शस्त्र गवसेपर्यंत हो सवंघ क्रांतिकारकांची परंपरा अशाच दहशत-वादांत चाचपडत होता. पारतंत्र्याची तीव्र जाणीव, राजकीय आंदोलनाची उभारी व भावी स्वातंत्र्याचा ध्यास—या गोष्टी वरील कवितेंत परिणामकारक रीतीने व्यक्त झालेल्या आहेत.

'तेव्हा आम्ही म्हटलें, ही ऱ्हासाची
रजनी केव्हा जाइल विरूनि साची?—
स्वतंत्रतेची पहाट ती येईल ?
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील ?'

या कवितेंत केशवसुतांनी 'स्वतंत्रतेची पहाट' असें म्हटलें आहे, 'स्वर्ग' वा 'सृष्टि' असें म्हटलेलें नाही. आंग्ल काव्याचे संस्कार दिले पडून कवि समकालीन जीवनाशीं समरस झाल्याच्या क्षणाचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'गोष्टी घराकडिल मी वदतां' या कवितेंत-देखील इतरांनी 'देशकारण करूं' म्हणावें, अशीच कवीची आमना व्यक्त झालेली आहे.

या दृष्टीनें पूर्वतयारीच्या कालखंडांत केशवसुत हे समकालीन हिंदी राष्ट्रीयतेचे उद्गाते होते, असें म्हणायला प्रत्यवाय नाही. व्यवसायस्वातंत्र्य, उद्यम यांचीहि तरफदारी, वर्धिष्णु वर्गाच्या वैचारिक प्रभावामुळें, त्यांनी क्वचित् केलेली आहे. 'जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें ?' या कवितेंत व्यवसायस्वातंत्र्याकडे, 'स्वावलंबी' 'उद्यमा'कडे मोर्चा वळवणाऱ्या तत्कालीन 'बूर्जा' आकांक्षेची द्योतक अशी विचारसरणी आलेली आहे. पण 'उद्यमा'च्या उपासनेबरो-बरच मजूरवर्गाबद्दलची सुधारणावादी सहानुभूति-सुद्धां त्यांच्या 'मजूरावर उपासमारीची पाळी' या कवितेंत व्यक्त झाली आहे. यांत 'कामगार-वर्गा'च्या आकांक्षा नसून पोटापुरतें मागणाऱ्या दासभूत मजुराचें मागणें आहे. भांडवलदारी अर्थ-व्यवस्थेविरुद्ध कवितेचा रोख नसून भांडवलदारीच्या प्राथमिक विकासावस्थेंतील मजुरांबद्दलची सहा-नुभूति व मांडवली 'उद्यमा' वरील विश्वास या दोन गोष्टी तींत अभिप्रेत आहेत. वस्तुतः प्रस्तुत कवितेंत दैववादच आहे.

या कवितांचा परामर्श घेतल्यावर आता प्रस्तुत कवीच्या दुसऱ्या वैचारिक कालखण्डाकडे वळणें आवश्यक आहे. यानंतर कवीची राजकीय वैचारिक भूमिका मागें पडून सामाजिक सुधारणेच्या प्रतिपादनाची भूमिका ठळकपणें पुढें आलेली दिसते. सामाजिक विषमतेची व राजकीय पार-तंत्र्याची आर्थिक मूल्यें कवींना अवगत नव्हतीं. नव्या बदललेल्या जमान्यांत सामाजिक सुधारणांची तरफदारी कां होऊं लागली याची मीमांसा पूर्वी केलीच आहे. सामाजिक सुधारणेच्या कवीच्या भूमिकेंत आंग्लनिसर्गप्रेमानें पुन्हा जोरदार उफाळी मारलेली दिसते. आणि, त्यामुळेच पुष्कळ वेळां कवीचें सामाजिक तत्त्वज्ञान कांहींसें आन्धळें व गूढगुंजनाकडे वळलेलें दिसेल.

• • •

कलाकृतींच्या संरक्षणासाठी

बालकृष्ण मार्तण्ड दाभाडे
एम्. ए.

● हल्ली ग्वाल्हेर येथें शिक्षणाधिकारी असलेले रा. बा. मा. दाभाडे ऊर्फ 'शशांक' हे अनेक ग्रंथांचे कर्ते म्हणून वाचकांस परिचितच आहेत. प्रस्तुत लेखांत त्यांनी सुप्रसिद्ध रशियन चित्रकार निकोलस रोरिक यांच्या एका विचारसूत्राचा विस्तार करून 'कलाकृतींच्या संरक्षणा'ची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

* * *

"शेकडों सेण्ट पॉलची मंदिरें आम्ही आमच्या कर्तबगारीवर निर्माण करूं, पण हिटलरचें जू गुलामामारखे मानेवर धारण करणार नाही!" ही इंग्रजांची वीरोक्ति कानांत घुमत असतांना पॅरिसचा प्रसंग डोळ्यापुढे उभा राहिला. साऱ्या जगांतील उत्कृष्ट नगरी म्हणजे पॅरिस. कलेचें माहेरघर तें! हिटलरच्या विमानहल्ल्यानें नेस्तना-बूतच व्हायचें, पण फ्रेंच सरकारनें पॅरिस न लढ-वितां हिटलरच्या स्वाधीन केलें व कलाकृतींचा नाश थांबविला. या दोन टोकांच्या उदाहरणांकडे नजर पुरविली, तर विचारी मनुष्याच्या विचाराला चांगलेंच खाद्य मिळेल. फ्रेंचांचें 'कलाप्रेम' व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंग्रजांचें ' स्वातंत्र्यप्रेम ' यांत अधिक मान्यता कुणाला मिळावी ? फ्रेंचांच्या कलाप्रेमापेक्षा मला इंग्रजांचें स्वातंत्र्यप्रेमच अधिक आवडतें. असें जरी आहे, तरी सेण्ट पॉल सारख्या अद्वितीय कलाकृतीचें जें नुकसान झालें, त्यामुळे जगाची जी हानी झाली आहे, ती पाहिली म्हणजे अंतःकरण व्याकुळ झाल्याखेरीज रहात नाहीं.

मानवीजीवनाची मूल्यें आज बदलूं लागलीं आहेत. मानवकृती या अहेतुक नसून त्यांत कांहीं तरी निसर्ग-संकेत आहे, हें तत्त्वज्ञान आता मान्य होऊं लागलें आहे. आजच्या अर्थप्रधान युगांत सुद्धा कलाकृतींचें महत्त्व अधिकाधिक पटूं लागल्याचें दिसून येत आहे. हल्लीच्या भौतिक जगांतील मनुष्याला अतीन्द्रिय सौंदर्याचें महत्त्व कळूं लागलें आहे. तें सौंदर्य तो ग्रहण करूं शकतो आणि जेव्हा त्याच्या मुखांतून प्रेम, कला, सौन्दर्य इत्यादि शब्द बाहेर पडतात, तेव्हा तो जगांतील सर्व रसिक विचारवंतांना भावणारी भाषा बोलत असतो, याचीहि आपणास जाणीव होते. हे विचार आज रंगभूमि, काव्य, पदार्थ-संग्रहालय एवढ्यांतच आहेत. ते जीवनाच्या प्रत्येक गतिमान पदक्षेपांत दिसावयास हवेत.

जगांतील भिन्न भिन्न संस्कृतींच्या लोकांना समजणारी जर कोणती एक भाषा असेल, तर ती एक कलेची आहे. संगीत कलेने पशु सुद्धा मोहित होतात. उदयशंकराच्या नृत्याने अमेरिकन लोक वेडे झाले. बुद्धाच्या सारनाथाच्या पद्मासनस्थ मूर्तीच्या मुखांवरील भाव पाहून जगांतील कोणत्याहि धर्माच्या विचारी व्यक्तीस अपूर्व आनंदच वाटेल. ताजमहालांतील कला कोणत्याहि राष्ट्रांतील प्रेक्षकास मोहित करण्याइतकी प्रभावी आहे. कलेची भाषा ही अन्तःकरणाची भाषा आहे. सौन्दर्याच्या द्वारें ती अन्तःकरणें भारून टाकते. भावनांची— विचारांची— देवघेव करते. आज एकमेकांशीं शत्रुत्व धारण करणाऱ्या राष्ट्रांना एकत्रित आणण्यास कलावंतांनी यत्न करावयास हवेत व त्याचबरोबर त्यांना उत्तेजन व संरक्षणहि मिळावयास हवें आहे.

भगवान् कृष्णांनी गीतेंत स्वतःच्या स्वरूपाचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं,

यद् यद् विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥

तो परमात्माच मुळीं सौंदर्यरूप आहे. जिथे जिथे सौंदर्य आहे, तिथे तिथे परमेश्वर उज्ज्वल स्वरूपांत आहे. मग कलावन्त हे परमेश्वराचें स्वरूप व्यक्त करणारे योगी आहेत, यांत काय संशय ? कलावंत हे या दृष्टीनें राष्ट्राची संस्कृति दर्शविणारे महान् पुरुष आहेत.

राष्ट्राची सांस्कृतिक उंची जर कलाकृतींवर व शास्त्रीय प्रगतीवरून व्यक्त होत असेल, तर अशा कलाकृतींना व शास्त्रीय शोधांना जगाकडून सक्तीने संरक्षण मिळालेंच पाहिजे. त्यांचा नाश मुळीच होणार नाही, याबद्दल जगांतील सर्व सुविद्य व सुसंकृत व्यक्तींनी यत्न करावयास पाहिजेत. युरोपांतील दुसऱ्या महायुद्धांत जगांतील कित्येक उत्कृष्ट कलाकृती भस्मसात् झालेल्या आपण पाहिल्या आहेत. हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्राचीन हिंदु कलाकृतीकडे आपण दृष्टि टाकावी, धर्मांध मुसलमानांच्या विवेकशून्यतेमुळें त्या भग्न झालेल्या आढळून येतील ! इतिहास असें सांगतो कीं, मुसलमान जेते आपल्याबरोबर मूर्तिभंजकांचे पथकच ठेवीत असत. या पथकांतील लोकांचे काम हेंच कीं, हिंदूंच्या दिसतील त्या शिल्पकृती नष्ट करणें ! बाबरासारख्या सौंदर्यप्रेमी बादशहालाहुद्धा अशा शिल्पकृती नष्ट करण्यांत धन्यता वाटावी, याहून दुर्दैव तें कोणतें ? आजकालहि विमानांतून होणाऱ्या बॉम्बच्या वर्षावामुळे सहस्रावधी कलाकृती नष्ट झालेल्या आपण पाहिलेल्या आहेत. त्यांचा नाश कसा थांबवावा, याबद्दल कोणीहि यत्न करतांना दिसून येत नाहीं. साठ वर्षांपूर्वी घडलेल्या अशासारख्या दुसऱ्या प्रसंगाची या वेळेला स्मृति होते. ड्युनंट याने रेड क्रॉसची महान् कल्पना जगापुढे मांडिली. लोकानी तेव्हा या कल्पनेची चेष्टा केली. निषेधहि केला. सतरा वर्षांच्या अव्याहत प्रचाराने या कल्पनेचें महत्त्व विचारी लोकांना पटूं लागलें. आज तिचें महत्त्व जगाने

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकमुखाने मान्य केलेलें आहे. मग "कलाकृतींच्या संरक्षणाची" कल्पना प्रथम दिसावयास हास्यास्पद वाटली, तरी ती याच पद्धतीने यशस्वी का होऊं नये ? राष्ट्रीय सांकृतिक धनांचें संरक्षण करण्यास प्रत्येक राष्ट्रांतील सुसंस्कृत जनता का पुढे येणार नाही ? या कल्पनेला विचारी लोक विरोध करतील, असें मला वाटत नाही. प्रत्येकाच्या अंत:करणांत हा प्रश्न केव्हाना केव्हा तरी उत्पन्न झालेला असेल. अनेक महात्मे यासाठी यत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. निकोलस रोरिक या जगप्रसिद्ध कलावन्तास १९०३ सालीं या कल्पनेचें महत्त्व पटलें व तेव्हापासून त्याने या कल्पनेच्या प्रसारासाठी यत्न सुरू केले. १९२९ सालीं युरोपांतील राष्ट्रांच्या पुढे ही योजना मांडिली गेली व अनेक राष्ट्रांनी या योजनेस मान्यता दाखविली. कलाकृतींच्या संरक्षणासाठी रोरिकने शांतिध्वजाची कल्पना पुढे मांडिली आहे. पांढऱ्या ध्वजावर एक वर्तुळ, त्या वर्तुळाच्या आंत एकमेकास स्पर्श करणारीं तीन वर्तुळें अशा तऱ्हेचा हा ध्वज ज्या ठिकाणीं फडकत असेल, त्यास्थळीं महत्त्वाची कलाकृति आहे, याची जाणीव सर्वांनी ठेवावी. युद्धामधील दोन्ही पक्षांतील लोकांनी या शांतिध्वजाच्या आश्रयाखाली कलाकृतींचा नाश न करतांना त्यांच्या संरक्षणाची पराकाष्ठा केली पाहिजे. ही जबाबदारी युद्धमान राष्ट्रांवर राहील. युद्धकाळींच नव्हे, तर शांतीच्या काळांत सुद्धा अविचारी मूर्तिभंजकांपासून या कलाकृतींचें संरक्षण व्हावयास पाहिजे.

जगांतील सर्व राष्ट्रांना या कल्पनेचें महत्त्व पटलें आहे. परन्तु या कल्पनेचा घडाक्याने पुरस्कार होऊन सर्व राष्ट्रांकडून तिला मान्यता मिळवून देणें अजून शक्य झालें नाही. मूर्तिभंजकांची, कलाकृतींचा नाश करणाऱ्या दुष्टांची, सर्वांना घृणा वाटत आहे. रेडक्रॉसच्या कल्पनेप्रमाणे 'कलाकृतींच्या संरक्षणासाठी' शांतिध्वजासारखी कल्पना जगांतील सर्व राष्ट्रें जेव्हा मान्य करतील, तेव्हा जग आपल्या सुसंस्कृतीचा टेंभा मिरवूं शकेल. या कल्पनेचे उत्पादक व त्यासाठी गेलीं ४४ वर्षे प्रयत्न करणारे निकोलस रोरिक यांच्या शब्दांत या लेखाचा शेवट करणें अधिक चांगलें होईल:—

"Verily humanity is tired of destructions vandalism and negation. Positive creativeness is the fundamental quality of the human spirit. In our life, everything that uplifts and ennobles the spirit must hold the dominant place... ...Be assured, it is not a truism to speak about the undeferrable and urgent strivings of culture... ......Let there resound once agian the mighty prayer for peace of the entire world. As the Red Cross affirms physical health, so may the Banner of Peace, establish and affirm the spiritual health of mankind."

• • •

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्याच्या सृष्टींत— साहित्यानंद

● 'साहित्यानंदां'च्या या अभिनव सदराचा हा दुसरा लेखांक होय. या सदरामधील वाङ्मयचर्चा तर वाचकांनी बारकाईने वाचावीच, पण त्यांतील पात्रांच्या स्वभावाच्या छटाहि सूक्ष्मपणें अवलोकन कराव्या.

* * *

१

श्री ज्ञानेश्वर प्रसन्न

वरूड

ता. १-६-४७

चि. अहल्येस अनेक आशीर्वाद. तुझें पत्र वेळींच मिळालें. 'उत्कृष्ट काव्यग्रंथ म्हणून ज्ञानेश्वरीचा नांवलौकिक ऐकल्यानंतर पुष्कळ तरुण मंडळी मोठ्या उत्साहाने तो ग्रंथ वाचायला घेतात; पण त्यांतील सुरवातीच्या गणेशवर्णनाच्या क्लिष्ट ओव्या वाचतांच आपल्या ज्ञानेश्वरी-वाचनाला कायमचा रामराम ठोकतात; आणि ज्याअर्थी या ग्रंथाची गेल्या शेकडो वर्षांतील पंडितांनी आणि रसिकांनी मुक्तकंठाने आणि जिव्हाळ्याने खूप कीर्ति गाइली आहे, आणि ज्याअर्थी आपल्याला त्यांतील सुरवातीच्याच ओव्यांचा नीट अर्थ लावतां येत नाही, त्याअर्थी हा काव्यग्रंथ खरोखरच अद्वितीय असला पाहिजे अशी आपल्या मनाची भाबडी समजूत करून घेतात'— या आशयाची तूं जी तक्रार मांडली आहेस, ती निःसंशय कांहीं अंशीं रास्त आहे. ज्ञानेश्वरींतलें आरंभींचें गणेशवर्णन कांहींसें क्लिष्ट झालें आहे, त्यांतलें रूपकहि थोडेसें ओढूनताणून साधलेलें आहे, असें आजच्या वाचकांना वाटण्याचा संभव आहे; पण ज्यांची आपल्या हिंदु तत्त्वज्ञानाशीं केवळ तोंडओळख आहे आणि ज्यांनी संतवाङ्मयाचें थोडेसें आस्थापूर्वक वाचन केलें आहे, त्यांना या रूपकांत मुळीच क्लिष्टता वाटूं नये, असें मला वाटतें. माझी तर पक्की खात्री आहे कीं, ज्यावेळीं खुद्द ज्ञानेश्वरांनी आपलें हें गीतेवरील प्रवचन सुरू केलें असेल आणि सुरवातीलाच हें अभिनव गणेशस्तवन गाइलें असेल, त्यावेळीं त्या स्तवनांतल्या सांग रूपकांतील मार्मिकता पाहून रसिक नी बहुश्रुत श्रोते बेहद्द खुष झाले असतील.

सुरवातीच्याच, तुझ्या दृष्टीने क्लिष्ट असलेल्या गणेशस्तवनालाच विचकून ज्ञानेश्वरीचें वाचन तूं थांबवूं नयेस, म्हणून तें सांगरूपक कसें समजावून घ्यावें, याची तुला मी एक सोपी युक्ति सांगतों. त्या रूपकांतील उपमेयें आणि उपमानें हीं समीकरणासारखीं समोरासमोर मांडावीं—त्यांतलीं कांहीं तुला मी मांडून दाखवितों.

देव = गणेश
अशेषशब्दब्रह्म = सुरेख मूर्ति
निर्दोष वर्ण = निर्दोष वपु
स्मृति = अवयव
रेखा = अंगिक भाव
अर्थशोभा = लावण्याची ठेव

अशा रीतीने १९ व्या ओवीपर्यंतचें हें रूपक समीकरणाच्या पद्धतीने मांडावें. नंतर प्रत्येक समीकरणांतल्या साम्यांतील औचित्य पडताळून पाहावें. निर्दोष वर्णांनाच वपु का म्हटलें? अर्थशोभेचें लावण्याच्या ठेवीशींच साम्य का दाखविलें?—अशा तऱ्हेचे प्रश्न सर्व समीकरणांबद्दल विचारून आपणच त्यांचीं उत्तरें शोधून काढावीं. एकदा हीं उत्तरें शोधून काढलीं कीं, तुला आपोआप त्या रूपकांतील सौंदर्य आणि सामर्थ्य प्रतीत झाल्यावाचून राहणार नाही; आणि मग तूंच आपण होऊन म्हणशील कीं, ज्ञानेश्वरासारख्या प्रतिभाशाली कवीशिवाय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतरांना असलें सुंदर व समर्पक रूपक सुचणेंच शक्य नाही.

एकदा तूं या गणेशस्तवनाच्या (तें गणेशस्तवन आहे की, देवस्तवन आहे, याचाहि जरा सूक्ष्म शोध कर) चक्रव्यूहांतून बाहेर पडलीस, म्हणजे तुला पुढची सगळी ज्ञानेश्वरी वाचतांना व तिचा अर्थ समजून घेतांना मुळीच त्रास पडणार नाही; कारण पुढचा सगळाच भाग अत्यंत प्रसादपूर्ण आहे; तो वाचीत असतांना जणुं कांही 'विश्वमोहिनी शारदाच' प्रत्यक्ष अवतरली आहे की काय, असा सहृदय वाचकांप्रमाणे तुलाहि साक्षात्कार झाल्यावाचून राहणार नाही.

ज्ञानेश्वरींतील या गणेशस्तवनाबरोबरच एकनाथी भागवताच्या सुरवातीचें गणेशवर्णन आणि तसेंच दासबोधातलें आरंभीचें गणेशवर्णन अवश्य वाचून पाहा; म्हणजे तुला त्या तिघांच्या वर्णनांत प्रत्येकाचें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसें उमटलें आहे, हें दिसून येईल.

असो. अधिक मार्गदर्शन पुढील पत्रीं.

अभ्यासांत नियमित असावें. प्रकृतीला जपावें. तुझ्या आईची प्रकृति ठीक नाही, असें ऐकलें. तिची विशेष काळजी घ्यावी. मलाहि वरचेवर पत्र पाठवून तिच्या प्रकृतीबद्दल कळवीत जावें.

तुझा मामा
लखु अण्णा.

●

२

॥ श्री ॥

आर्वी
ता. ९-६-४७

प्रिय देवेन्द्र यांस सा. न. वि. वि. आपल्या पत्राची वाट पाहतां पाहतां मी अगदी कंटाळून गेल्यें. माझ्या गेल्या पत्रांत मीं उपस्थित केलेल्या निरनिराळ्या वाङ्मयविषयक प्रश्नांचीं सविस्तर उत्तरें पाठविण्याचें तुम्हीच मला आश्वासन दिलें होतें; पण आता तुम्हाला त्या आश्वासनाचें सोईस्कर विस्मरण झालेलें दिसतें. तुम्हाला सध्या हीं उत्तरें पाठवायला फुरसत नसेल, तर निदान खुशालीचें बोटभर पत्र तरी पाठवायचें!

मामांचीं पत्रें मात्र नियमितपणें येत असतात. गेल्या आठवड्यांत त्यांचं जें पत्र आलं तें म्हणजे जणुं कांही ज्ञानेश्वरींतल्या पहिल्या गणेशस्तवनाच्या ओव्यांवरील एक छोटासा सूचक पाठच! मामांच्या सांगण्यावरून मीं ज्ञानेश्वरी वाचायला सुरवात केली पण पहिल्याच गणेशवर्णनाच्या ओव्यांवर अडल्ये! लगेच मामांपुढे अडचण मांडली. त्यांनी मोठ्या तत्परतेने या अडचणींतून बाहेर पडण्याची मला वाटहि दाखविली. त्यांच्या म्हणण्याचा असा आशय दिसतो की, एकदा मीं हा ज्ञानेश्वरींतील प्रारंभीच्या गणेशवर्णनाचा डोंगर ओलांडला की, पुढला सारा प्रवास फुलाफळांनी फुललेल्या नी शीतल जलाशयांनी विनटलेल्या सपाट प्रदेशांतूनच व्हायचा आहे! प्रवास डोंगरकपारींतून असो की सपाट मैदानांतून असो, मी तो करायचा ठरविलें आहे; त्यामुळे माझी अनायासें परीक्षेची तयारी होईल व मामांच्या शब्दांना मान दिल्याचें श्रेयहि पदरांत पाडता येईल.

हो, मी तुम्हाला सांगायला विसरलेंच! मी या वर्षी कॉलेजात न जाता घरींच राहून खाजगी रीतीने अभ्यास करून परीक्षेला बसण्याचें ठरविलें आहे. आईची प्रकृति आता फारच खालावलेली आहे. घरच्या शेतीवाडीच्या अवाढव्य पसाऱ्याकडे जातीने लक्ष घालणें तिच्या प्रकृतीमुळे तिला आता शक्य नाही. दिवाणजी वगैरे लोक आहेत; पण घरचंच कोणीतरी माणूस पाहायला असल्याशिवाय कामावर चांगली देखरेख ठेवतां येत नाही.

दुसरी तुम्हाला कळविण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी इथेच राहायचें ठरविल्यामुळे इथल्या भगिनी मंडळांत खूप उत्साहाने भाग घ्यायला सुरवात केली आहे. गेल्या वर्षादीड वर्षापासून जवळजवळ झोपी गेलेलं भगिनी मंडळ माझ्या खटपटीमुळं आता चांगलं खडबडून जागं झालं आहे. आमच्या मंडळातर्फे मी मध्यम वर्गातल्या स्त्रियांकरिता दोन उपक्रम सुरू करण्याचें ठरविलें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

आहे. एक, स्त्रियांना उपयुक्त होईल अशी व्याख्यानमाला चालविणें आणि दुसरा, त्यांच्यांत वाङ्मयाची अभिरुचि निर्माण करणारं आणि वाढविणारं एक मासिक चालावेणें. मंडळांतल्या सर्व भगिनींचा मला भरपूर पाठिंबा आहे. विशेषत: आमच्या गांवांतल्या, साहित्यांत आणि बायकांत सारखीच लुडबुड करणाऱ्या गजाभाऊ गायतोंड्यांनी असेच दोन उपक्रम गांवांत सुरू केल्यामुळे, आपणहि असे उपक्रम अगदी यशस्वी रीतीने सुरू करून चालू ठेवूं शकूं, असा आत्मविश्वास मंडळांतल्या भगिनींत निर्माण झाला आहे. पाहूं या आता काय काय होतें तें!

माझ्या पहिल्या पत्रांतील वाङ्मयविषयक पत्रांचीं उत्तरें देणाऱ्या आपल्या पत्रांची मी सारखी वाट पाहात राहीन.

आपली नम्र

अहल्या.

ता. क.—आमच्या व्याख्यानमालेंतील एखादें तरी पुष्प गुंफण्याचें मी तुम्हाला आताच आमंत्रण देऊन ठेवलें. कोणत्याहि सबबीवर नकार स्वीकारला जाणार नाही. —अहल्या.

●

३

वंदेमातरम्

उमरावती

ता. १२-६-४७

प्रिय अहल्येस सप्रेम आशीर्वाद.

मामांच्या शब्दाकरिता किंवा तुझ्या परीक्षेकरिता का होईना, तूं ज्ञानेश्वरी वाचण्याचें ठरविलें आहेस, ही फार चांगली गोष्ट झाली. अंगीं उच्च प्रतीची रसिकता बाणवून घेण्याकरिता वरचेवर ज्ञानेश्वरीसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या काव्यग्रंथांचें वाचन अवश्य केलेंच पाहिजे. अर्नोल्ड बेनेट नांवाचा एक इंग्रजी टीकाकार आहे. त्याने वाङ्मयाची आवड आपल्या ठिकाणीं कशी निर्माण करावी, यासंबंधीं उपदेश करतांना ‘Begin with the classics’ असाच संदेश दिला आहे. खि. पू. दुसऱ्या शतकांत होऊन गेलेला लुसिअन नांवाचा ग्रीक साहित्यशास्त्रकार तर याच्याहि पुढे जाऊन म्हणतो: “Begin with the best poets and read them with a tutor.” अव्वल दर्जाचे काव्यग्रंथ वाचावे आणि तेहि योग्य गुरूच्या मार्गदर्शनाखाली वाचावे.

आपल्या मराठींत तर याच्या अगदी उलट स्थिति आहे. केवळ सुशिक्षितांचेंच नव्हे, तर स्वत:ला नावाजलेले समजणाऱ्या आजकालच्या कित्येक साहित्यिकांचें वाचन बहुतांशीं प्रचलित ललित वाङ्मयापुरतेंच मर्यादित असतें. अलीकडे शाळाकॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या व साहित्यिक म्हणून मिरवूं इच्छिणाऱ्या तरुणांत तर ही, ललित वाङ्मयापुरतेंच आपलें वाचन संकुचित ठेवण्याची प्रवृत्ति, फारच बळ धरूं लागली आहे! ही अत्यंत अनिष्ट प्रवृत्ति आहे. तिला आळा घातला पाहिजे. ज्ञानेश्वर-तुकाराम–रामदास वगैरे प्राचीन मराठींतील थोर कवींच्या काव्यग्रंथांचें पद्धतशीर अध्ययन जितकें आजच्या सुशिक्षितांत आणि साहित्यिकांत जास्त वाढेल, तितकें तें मराठी वाङ्मयाच्या पोषणाला आणि विकासाला फार उपकारक होईल, असें मला वाटतें.

मराठींतील संतवाङ्मयाच्या दृष्टीनें एक मात्र इष्ट गोष्ट अलीकडे घडून आली आहे. अनेक वर्षांच्या अनेक साहित्यभक्तांच्या परिश्रमामुळे आणि सतत प्रचारामुळे, प्राचीन संतवाङ्मय हें काव्यगुणाच्या दृष्टीने फार थोर आहे, अशी सर्वांची खात्री पटलेली आहे. त्यामुळे संतवाङ्मयाबद्दलची पूर्वीची अनादराची आणि तिरस्काराची भावना आता नष्ट झाली आहे; पण तीऐवजीं हें संतवाङ्मय फार थोर आहे, इतकें की, तें आपल्या आकलनशक्तीच्या बाहेरचें आहे, अशी त्याबद्दलची अत्यंत घातुक स्वरूपाची वृत्ति आजच्या सुशिक्षितांत निर्माण होऊं पाहात आहे. शाळाकॉलेजांतून संतवाङ्मयांतील कांही निवडक उताऱ्यांचा विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेतात;

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण त्याचा परिणाम त्या वाङ्मयाविषयीं खरी जिव्हाळ्याची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने कांहीच होत नाही. या अभ्यासानंतरहि त्यांच्या ठिकाणीं संतवाङ्मयाविषयीं परकेपणाची, अनात्मीयतेची प्रवृत्ति कायमच राहते. या प्रवृत्तीची एक प्रतिनिधि म्हणून मी तुझ्याकडे पाहतों. तुझ्या मामांच्या आणि कांही अंशीं माझ्या प्रयत्नामुळे तुझ्या ठिकाणची ही प्रवृत्ति नष्ट झाली, म्हणजे मला आणि मामांना सुद्धा खरोखर फार आनंद होईल; आणि, प्राचीन संतवाङ्मयांतल्या काव्यामृताचा रसास्वाद घेऊं शकणारी एक रसिक व्यक्ति आपण तयार करूं शकलों, एवढें समाधान मानायला जागा होईल.

प्राचीन अभिजात वाङ्मयाविषयीं अशी अनास्था उत्पन्न होण्यास रसग्रहणाच्या बाबतींत एक विपरीत समज कारणीभूत झाला आहे. तो हा की, चार पुस्तकें वाचतां आलीं, एखादी पदवी पटकावितां आली की, कोणत्याहि श्रेष्ठ प्रतीच्या वाङ्मयीन कृतीचें गुणग्रहण करण्याचा, तसेंच, तीवर अनुकूल-प्रतिकूल मत प्रदर्शन करण्याचा कोणालाहि अधिकार पोहोचतो. काव्यांतलें काव्यत्व ओळखण्याकरिता विशिष्ट प्रकारची मानसिक तयारी करावी लागते, विशिष्ट दर्जाची रसिकता कमवावी लागते—हें कुणाच्याच लक्ष्यांत येत नाही. हेच लोक इतर विषयांच्या बाबतींत एखादें प्रमेय समजावून घेण्याकरिता पूर्वज्ञानाची आवश्यकता असते, असें कबूल करतील. आईन्स्टाइनचा सापेक्षतावाद समजावून घेण्याकरिता आधी गणितशास्त्राचा व पदार्थविज्ञानशास्त्राचा, तसेंच, मार्क्सचा विरोधविकास-वाद समजावून घेण्याकरिता आधी अर्थशास्त्राचा आणि समाजशास्त्राचा भक्कम व्यासंग केला पाहिजे, हें त्यांना लगेच पटेल. पण शेक्सपिअर, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर, केशवसुत-वगैरे थोर कवींच्या काव्यग्रंथांतील काव्याचें सर्वांगीण आकलन होण्याकरिता विशिष्ट दर्जाची रसिकता प्राप्त करून घ्यावी लागते, हें मात्र त्यांना पटत नाही. साहित्यजगतांतला हा मोठा अनिष्ट लोकभ्रम आहे! तो दूर केला पाहिजे. वाङ्मयीन कृतीवर मतप्रदर्शन करूं इच्छिणाऱ्या साहित्यकारांनीं आणि टीकाकारांनी " The judgment of literature is the final aftergrowth of much endeavour " हें लॉंगिनस या प्रसिद्ध ग्रीक साहित्यशास्त्रज्ञाचें वाक्य निरंतर ध्यानांत ठेवलें पाहिजे. उच्च प्रतीची रसिकता मिळविण्याकरिता सतत परिश्रम करावे लागतात, अभिजात वाङ्मयाचें निष्ठापूर्वक एकसारखें वाचन चालू ठेवावें लागतें, ही गोष्ट मनांत पक्की ठसली पाहिजे. बेन जॉनसन तर म्हणतो की, रसिक होणें हें श्रेष्ठ कवि होण्याइतकेंच कठीण आहे. ज्याच्या ठिकाणीं उच्च श्रेणीचे काव्यगुण असतील, तोच वाङ्मयाचें यथार्थ रसग्रहण करणारा टीकाकार होऊं शकतो. या संबंधांतलें त्यांचें वाक्य सुप्रसिद्धच आहे: To judge of poets is only the faculty of poets and not of all poets but the best. "

हें सारें विस्तारपूर्वक विवेचन करण्याला तुझ्या पहिल्या पत्रांतलें " मला तर पुष्कळ प्रयत्न करूनहि ज्ञानेश्वरींतलें काव्य प्रतीत होत नाही " हेंच वाक्य मुख्यत: कारणीभूत झालें. आता तरी तुला, ज्ञानेश्वरींतील काव्य कळण्याकरिता ठराविक दर्जाची रसिकता अंगीं असावी लागते, हें पटेल, असें वाटतें. ज्ञानेश्वरीचें वाचन तूं नियमितपणें करीत गेलीस, तर तुझ्या ठिकाणीं आपोआप ती रसिकता निर्माण होईल, तुला त्यांत गोडी वाटूं लागेल आणि त्यांतील काव्याचा आस्वाद घेतां येईल, असो.

हें पत्र फारच लांबलें. तुझ्या पहिल्या पत्रांत तूं उपस्थित केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें मी पुढील पत्रांत अवश्य पाठवीन.

आईच्या प्रकृतीकडे लक्ष्य देऊन तूं घरींच राहून अभ्यास करायचें ठरविलेंस, हें ठीकच झालें.

तुझ्या भगिनी–मंडळातर्फे तूं व्याख्यानमाला व मासिक चालविण्याचें योजिलें आहेस, याबद्दल मी तुझें मन:पूर्वक अभिनंदन करतों आणि तुझ्या कार्यांत तुला उदंड यश मिळो, अशी सदिच्छा व्यक्त करतों.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तूं आता एकूण संपादिका होणार तर ? संपादकात्वाबरोबर मासिकाची आर्थिक जबाबदारीहि, सुरवातीला तरी, तुलाच घ्यावी लागेल, असें वाटतें. तूं ती जबाबदारी अवश्य घ्यावी. तो तुझ्या संपत्तीचा सद्व्ययच होईल.

तुझ्या पत्रांत उल्लेखिलेली तुमच्या गांवची गजाभाऊ गायतोंडे ही वल्ली कोण ?

पत्रोत्तर अवश्य द्यावें.

तुझा
देवेन्द्र.

●

४

जय सोवियत.

मुंबई
खेतवाडी
ता. ११–६–४७

दोस्त देवेन्द्र यांस लाल सलाम.

खरं सांगूं, देवेन्द्र, मला असं वाटत होतं की, विरोध-विकासवाद, जडवाद यांसारख्या रुक्ष, शास्त्रीय विषयांची चिकित्सा करणारा मार्क्स हा पक्का ' गद्यराची' (म्हण.जे Prosaic अं!) माणूस असला पाहिजे; पण गेल्या पत्रांत मी ज्या पुस्तकांचा निर्देश केला होता, त्यापैकीं कांही जेव्हा वाचून पाहिलीं, तेव्हा वाङ्मयाची आवड मार्क्सच्या अगदीं रोमारोमांत भिनली होती, असं मला आढळून आलं. सारा शेक्सपिअर तर म्हणे त्याच्या अगदीं जिव्हाग्रावर नाचत होता. बाल्झॅकचीं तर त्यानें पारायणेंच केलीं होतीं. ॲचिलिस या थोर ग्रीक नाटककाराचीं नाटकें तो मुळांतून दरवर्षी अगदीं नेमानें वाचीत असे. याशिवाय, त्याने बहुतेक सर्व प्रधान युरोपीय भाषांतील वाङ्मयाचा-विशेषतः नाट्य वाङ्मयाचा-खूप खोल अभ्यास केला होता तो निराळाच. 'Capital' सारख्या आपल्या केवळ शास्त्रीय स्वरूपाच्या ग्रंथांत सुद्धां कांही समाजशास्त्रीय नी ऐतिहासिक विधानें सिद्ध करण्याकरितां त्याने बॅल्झॅकच्या कादंबऱ्यांतील प्रसंग आधार म्हणून उद्धृत केलें आहेत म्हणतात-यावरून त्याची वाङ्मयाची आवड किती जिव्हाळ्याची होती, हें स्पष्ट दिसून येईल.

पण ' वाङ्मयाकरिता वाङ्मय ' म्हणणाऱ्या सारख्याच्या आवडीसारखी त्याची वाङ्मयविषयक आवड मात्र नव्हती, अं ! एकतर, तो लोकशिक्षणाचें एक जबरदस्त साधन म्हणून वाङ्मयाकडे पाहात असे; आणि पुन्हा, विशिष्टकाळीं विशिष्ट देशांतल्या समाजांतली अर्थव्यवस्था कशी होती, त्या समाजांतल्या निरनिराळ्या वर्गांचे परस्पर संबंध कशा स्वरूपाचे होते, हें समजावून घेण्याकरिता वाङ्मय ही एक अत्यंत उपयुक्त शक्ति आहे, असें त्याला वाटत असे. बॅल्झॅकच्या कादंबऱ्या तो वाचीत असे, पण त्या वाचीत असतांना त्यांत येणाऱ्या "If the products of industry did not possess a value twice as great as the cost of their production, trade would not exist" अशा वाक्यावरच त्याचें सारें लक्ष्य खिळून जात असे. आज सोव्हिएटांचा वाङ्मयाकडे पाहण्याचा अधिकृत दृष्टिकोन म्हणून Social Realism चा (याला मराठींत काय म्हणायचे ! समाजवादी वास्तवतावाद ? कीं साम्यवादी यथार्थवाद ?) जो पुरस्कार करण्यांत येतो, त्याचा उगम मार्क्सच्या या वाङ्मयविषयक दृष्टिकोनांतच आहे, असें मला वाटतें.

अच्छा ! झाली ही वाङ्मयचर्चा मला वाटतें बस्स झाली. मी आता लवकरच आमच्या पार्टीच्या कामाकरिता दूर दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यांत जीवनांतला सर्व प्रकारचा—भलाबुरा, नरम गरम, खाटतुरट—जो मिळेल तो अनुभव अगदी आधाशीपणाने संपादन करायचा, असं मी ठरविलं आहे. तुला नाही वाटत की, ज्या साहित्यकारांनी आपल्या साहित्यांत आपल्या समृद्ध जीवनाचा अर्क ओतला आहे, त्यांच्या साहित्याशीं समरस होण्याकरिता आपलंहि जविन आपण अनुभावनं समृद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे ! तुम्हां पुस्तकी पंडितांना कदाचित् ही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोष्ट पटायची नाही. माझी तर बुवा अगदी बालंबाल खात्री झाली आहे की, पुस्तकांतल्या कोरड्या शाब्दिक जगांत अनुभवाचा एक घोट सुद्धा प्यायला मिळायचा नाही ! अरे तुझा तो पूज्य विनोबाच तर म्हणतो की, अर्थ पुस्तकांत राहत नाही, मूर्तींत राहतो. अश्व या शब्दाचा खरा अर्थ कोशांत शोधणें फुकट आहे; कारण तो कोशांत मावणेंच शक्य नाही. तो प्रत्यक्ष तबेल्यांतच जाऊन पाहिला पाहिजे !

खरंच, देवेन्द्र, तुमच्या या पुस्तकांतल्या जगांत मर्दुमकी गाजविणाऱ्या वाचिवीरांच्या मोठमोठ्या वल्गना ऐकण्यांत मला मोठी मौज वाटते. परवा म्हणे हैदराबादच्या त्या साहित्यसंम्मेलनाच्या व्यासपीठावर तथाकथित ‘ झुंजार ’ (?) अध्यक्ष गरजले—“ ज्या सामर्थ्याने आम्ही ब्रिटिशांची सत्ता संपुष्टांत आणली, त्याच सामर्थ्याने आम्ही निजामाच्या सत्तेला लोकशक्तीपुढे शरण यायला लावूं ! ” कोण ही फुकटची फाजील बढाई ! राजकीय पुढाऱ्यांनी रक्ताचे पाणी आटवून आणि अनुचित हाल सोसून कर्तृत्व गाजवावं आणि त्याचें श्रेय तुमच्यासारख्या निष्क्रिय बोरूबहाद्दरांनी घ्यावं, हा खूप अजब न्याय म्हटला पाहिजे !

बरं, कारे, तुझ्या त्या अहल्या शहाणेची कांही खबरबात तर मधून मधून कळवीत जा ! तो माझ्यावर लाख नाराज असेल; पण त्यामुळे माझी तिच्याविषयींची ओढ थोडीच कमी होणार आहे ? तिला वाङ्मयाचे डोस पाजण्याचें तुझें काम सुरू असेलच म्हणा ! अलीकडे वाङ्मयांतहि बुवाबाजी करण्यास सवकलेल्या मराठींतील कांही प्रथितयश साहित्यकारांवरहि ताण करून तूं आपल्या भोवती नाजुक भावुक, साहित्य प्रेमी, गुलहौसी शिष्यिणींचा तांडा जमविण्याच्या खटाटोपांत आहेस, असें मला वाटूं लागलें आहे ! तुझ्या त्या विदर्भांतल्या कुग्रामांत देवेंद्र-स्वामींचा साहित्याश्रम उघडल्याची वार्ता मला लवकरच वाचायला मिळेल, अशी आशा बाळगूं का ?

बरं ! मी आता महिना—सवा महिना मुंबईच्या बाहेर राहणार आहे; त्यामुळे तुझीं पत्रं मला वेळेवर मिळण्याची अडचण पडेल; त्यापेक्षा तीं न पाठविलेलींच बरीं. पुन्हा, कामाच्या गडबडींत तुझ्या पत्रांतल्या विचारांचं सावकाश चर्वण करायला मला फुरसत मिळणार नाही, महिना-दीड महिन्यांनी मात्र मी तुझ्या पत्रांची अवश्य आणि तीहि अत्यंत आतुरतेने वाट पाहीन.

अच्छा ! अहल्या भेटलीच तर तिला माझा लाल सलाम सांग.

तुझा दोस्त
भाई श्रीधर.

• • •

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा !!

सभासद नोंदणीची अखेरची तारीख

१५ नोव्हेंबर १९४७

वार्षिक वर्गणी पहिला वर्ग (‘ युगवाणी ’ सह) रु. ५, दुसरा वर्ग रु. २.

टीप:—चालू दार सभासदांनीहि नवीन निवडणुकीसाठी ता. १५-११-४७ पर्यंत वर्गणी पाठवावी.

(प्रा.) नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, अमरावती.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोड रहस्य— (एकांकिका)

मूळ लेखक— फिलिप् जॉन्सन्.
अनुवादक— द. चिं. सोमण.

● फिलिप् जॉन्सन् यांच्या एका एकांकिकेचें कवि सोमण यांनी सरस भाषांतर केलें आहे. ही एकांकिका गूढ-रमणीय आहे. ती वाचतांना मेटरलिंक, यीट्स-प्रभृतींच्या दृश्य रचनेची आठवण होते.

पात्रें

१ आई : २ मुलगी : ३ जेजारीण : ४ तरुण मनुष्य

[उतरतें छप्पर असलेल्या एका खोलींतील अंतर्भाग. भिंतींना पांढरा रंग दिलेला असून डाव्या भिंतींत मध्यभागीं मोठी शेगडी बसविलेली आहे व उजव्या भिंतींत बाहेर जाण्याचा दरवाजा आहे. पाठीमागच्या भिंतीला दुसरें एक दार असून दाराच्या उजवीकडे एक लांब आडवी खिडकी आहे. खोलीच्या मध्यभागीं एक साधें टेबल आहे व त्याच्याजवळ दोन साध्याच लाकडी खुर्च्या आहेत. दुसऱ्याहि दोन तीन तशाच खुर्च्या सोय पाहून खोलींत निरनिराळ्या जागीं मांडलेल्या आहेत. दुसरें एक टेबल भिंतीजवळ असून त्याच्यावरील फळ्यांवर चिनी मातीच्या लहान-मोठ्या बशा, कांचेचे ग्लास, कपबशा वगैरे सामान आहे. मध्यभागीं असलेल्या टेबलावर एक पांढऱ्या रंगाचा वेष पडलेला आहे; तो स्त्रीचा असून लग्नप्रसंगीं वधूने वापरायचा आहे, असा तर्क करणें सोपे आहे.

पडदा वर जातो, तेव्हा खोलीच्या पाठीमागील भिंतींतला दरवाजा उघडा आहे. दरवाजांतून व खिडकींतून बाहेरील दूरच्या टेकड्या दिसत आहेत. वेळ संध्याकाळची असून सूर्य नुकताच टेकड्यांमागे मावळला आहे. त्यामुळे टेकड्यांचा रंग जांभळट काळसर असा आहे. आकाशांत मात्र गुलाबी सोनेरी अशी मोहक प्रभा थाटलेली आहे. बाहेरील प्रकाशापैकी कांही खोलींत भीतभीत आल्यासारखा वाटतो व त्या प्रकाशामुळे खोलींत सगळीकडे अंधुक अंधुक उजेड आहे, तरी खोलींतील वस्तु दिसणार नाहीत, इतकी अंधुकता अर्थातच नाही.

आई शेगडीजवळ गुडघे टेकून बसलेली आहे. शेगडीवर एका भांड्यांत कुठलातरी खाद्य पदार्थ उकळत आहे व ती ढवळण्याचें काम ती करीत आहे. आईचें वय, तिचे केस नुकतेच पांढरे व्हायला लागले आहेत यावरून, ओळखतां येतें. तिचा बांधा रुडपातळ असून तिचा वेष अगदी साधा स्वस्त कापडाचा असला तरी नीटनेटका आहे.

मुलगी भिंतीतल्या दरवाजाजवळ खोलीच्या अंतर्भागाकडे पाठ करून बाहेर पाहत उभी आहे. तिचें वय एकोणीस--वीस असून ती सडपातळ, उंच व सुरेख आहे. तिचाहि वेष सामान्य, पण व्यवस्थित आहे.]

मुलगी (स्वत:शींच)—मोहक......मोहक...

आई (तिच्याकडे मान वळवून)—काय म्हणालीस तूं ?—

[मुलीचें सारें लक्ष्य बाहेरच्या सृष्टिसौंदर्याकडे असतें, त्यामुळे तिला आईचे शब्द ऐकूं येत नाहीत.]

...काय ?–काय विचारते आहे मी ? ऐकलंस का ? काय म्हणालीस तूं ?

मुलगी (तंद्रींतून जागी होऊन आईकडे पाहात)—कांही नाही, आई !

आई—नाही कसं ? वाईट सवय लागली आहे ही तुला अलीकडे ! वेड्यासारखी स्वत:शींच काय बोलतेस !

मुलगी—आता सुटेलच ही सवय ! (हलक्या आवाजांत) आई ! आता त्याच्याशीं खूप बोलतां येईल मला, नाही का ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आई—त्याच्याशीं ! अस्सं ! आता मी आणि तुझा बाप यांना जागा नाही म्हणायची तुझ्या आयुष्यांत !

मुलगी (कळवळून)—कसं बोलवतं ग तुला असं ? तुम्ही नकोशी व्हाल वाटतं मला ? ...आई......पण......पण......तो सुद्धा मला हवा ! !

आई—हं !

मुलगी—रोज संध्याकाळीं.....तो आणि मी ...सूर्य मावळतांना बसत बसत असूं आम्ही !...

आई—वेडी ! अग, तो थकून भागून शेतावरून येईल, खूप भूक लागलेली असेल त्याला रोज संध्याकाळीं ! आल्यावरोबर स्वयंपाकाची चौकशी करील तो, समजलीस ? तो विचारील, 'स्वयंपाक झाला का ?'-आणि, तूं म्हणशील, 'छे ! पण सूर्य पाहा किती सुरेख दिसतो आहे मावळतांना !' हो ना ?—मी तिथे असायला हवी अशा वेळीं; त्याची मुद्रा पाहून मला...... मी काय सांगतें, तें ध्यानांत ठेव, अन्नाचं एक भांडं हें हजारो मावळत्या सूर्यापेक्षा नवऱ्याला महत्त्वाचं वाटतं ! लक्ष्यांत ठेव हें ! !

मुलगी—अग, मला नाही का त्याच्या भुकेची काळजी ? सारं नीट करीन मी !

आई—जोंपर्यंत त्याची भूक तुझी वाट बघते, तोंपर्यंतच त्याचं हृदय तुझ्या विरहानं कासावीस होईल ! विसरूं नकोस हें !

[मुलगी पुन्हा आईकडे पाठ फिरवून दरवाजांतून बाहेरची सृष्टि बघायला लागते.]

मुलगी (बाहेर पाहतच)—किती अप्रतिम मोहकता आहे ही ! असं वाटतं या साऱ्याला स्पर्श करून हें खरं की खोटं पाहावं !

आई—(शेगडीशीं तशीच बसलेली आहे.) स्पर्श करून ? कशाला स्पर्श करायचा वेडे ?

मुलगी—हें ! ही सारी मोहकता !

आई—वेडी रे वेडी ! त्याला कसा स्पर्श करतां येईल ?

मुलगी— येणार नाही, पण यायला हवा ! हें सगळं गोळा करून घ्यावं आणि हृदयाशीं दाबून धरावं !

आई (किंचित् त्रासून)—कांही तरी बोलते आहेस तूं ! तुझ्या बोलण्याला कांही अर्थच नाही आणि तुलाहि ठाउक आहे हें ! लहान असतीस, तर हें बोलणं तुला शोभलं असतं-सगळीं लहान मुलं तशींच असतात ! पण आतां तूं कांही लहान नाहीस ! वयाने वाढलीस, पण मनाने अजून... तूं लहान नाहीस, हें लक्ष्यांत ठेव ! उद्या यावेळेपर्यंत तुझं लग्न झालेलं असेल, एक विवाहित स्त्री होशील तूं ! मग असं कसं चालेल ?

मुलगी—आई ! माझं लग्न होणार, म्हणूनच कदाचित् मला हा सूर्यास्त मोह घालीत असेल !

(आई कांही तरी बोलायचा विचार करते, पण मूक राहून पुन्हा शेगडीवरील त्या भांड्यांतला पदार्थ ढवळायला लागते.)

—कुणी तरी येतं आहे ! त्या पलीकडच्या शेतांतून जवळच्या वाटेनं येतं आहे.

आई— तुझा बाप कांही नसेलच तो ! तो इतक्यांत येणारच नाही !

मुलगी—बाई दिसते आहे कुणी तरी ! अग, आपली ती शेजारीण आहे ती !

आई (त्रासून)—हं ! कशाला येते आहे ? तिच्या त्या नवऱ्याचं कांही तरी सांगायला येत असेल ! सदा न् कदा येऊन रडगाणं गात बसते !

मुलगी—हं ! आली ती, बोलूं नकोस !

[मुलगी दरवाजाकडून खोलीच्या मध्यभागाकडे येते. शेजारीण खिडकीजवळून बाहेरच्या बाजूने येतांना दिसते व दुसऱ्याच क्षणीं दरवाजांत उभी राहते. तिचें वय जवळ जवळ पन्नास असून ती चांगली सशक्त आहे. तिने नवऱ्याचीच टोपी डोक्यावर ठेवली असून तिचा वेष साधा व अगदी गबाळ आहे]

शेजारीण—काय उकडलं आज ! भट्टी पेटली होती नुसती !

आई (तशीच बसून)—छान !

शेजारीण—आमचीं डुकरं शेतांतच भाजून निघालीं उन्हाने !

आई—उन्हाचं काय ? गवत करपलं, पण योग्य वेळीं कापायचं नाही आणि मग हिरवा चारा नाही, म्हणून उन्हाच्या नांवाने खडे फोडायचे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याने त्यानें स्वत:ला दोष द्यावा व पुढे काळजी घ्यावी !

शेजारीण—अगदी खरं ! त्या टेकडीखालि गवत आता कापणं चाललं आहे !

आई—यंत्राने काम चाललं आहे ना !

आवाज ऐकला मघाशीं !

शेजारीण—हं ! उद्या केस्टरच्या शेतावर काम आहे त्यांना ! हे शेतकरी म्हणजे एकापेक्षा एक आळशी आहेत. आणि, मग सदा तोट्यांत आणि असमाधानांत !

आई—सुखी, समाधानी असा शेतकरी मला आढळला की, मग मी म्हणेन की, जग पूर्ण सुधारलं !– या ना पण आंत ! बसा, दरवाजातच किती वेळ थांबणार ?

(शेजारीण खोलींत येते–)

शेजारीण (मुलीला)—काय ? –ठीक आहे ना ?

मुलगी—ठीक आहे !

शेजारीण—नाचतांना पुरेवाट होत असेल आता ? खरं की नाही ? हं ! उद्याचा दिवस तुझ्या आयुष्यांत फार महत्त्वाचा आणि आनंदाचा ! माझ्या स्वत:च्या लग्नाचा दिवस अजून चांगला आठवतो मला ! कधीच त्याचा विसर पडायचा नाही. आम्ही चर्चमध्ये होतों, तेव्हा बाहेर पाऊस, वारा, विजा, वादळ–सारं कांही होतं ! ओरडल्याशिवाय कुणाला कांही ऐकूंच जायचं नाही. लग्नाच्या शपथा घेताना देखील आम्हांला आरोळ्या ठोकाव्या लागल्या. आणि मग भोजनसमारंभाला बसलों, तर वाऱ्याने छप्परच उडवून नेलं ! सारा गोंधळ झाला ! माझ्या पुढील जीवनाचं भविष्यच सांगितलं त्या वाऱ्यान !

आई—अस्सं !

शेजारीण—आम्ही आनंदाने बसलों होतों, तों माझा बाप आला धावत ! पांढराफट्टक पडला होता आणि निथळत होता घामाने ! ' आपल्या डुकरांचं घर गेलं उडून ! ती म्हातारी डुकरीण मरून पडली आहे ! अगदी खिळ्यासारखी गार गार झाली आहे !'–असं लागला किंचाळायाला ! माझं लग्न लागलेलं होतं, तेव्हा तें घर माझं थोडंच समजणार मी ? ' अरस्‌ ! '– एवढाच उद्‌गार मी काढला आणि खुर्चीवर आरामशीर बसणार, तों आमच्या डोक्यावरचं छप्पर गेलं उडून ! खरं म्हणजे...... (टेबलावर पडलेल्या पांढऱ्या वेषाकडे तिची नजर जाऊन) छान ! छान ! हा का वधूवेष ? ठीक,ठीक, व–धू–वे–ष!

आई—(शेगडीजवळून उठत)–हं ! हाच तिचा वधूवेष !

शेजारीण—(टेबलाकडे जात)- छान, छान !

मुलगी—पोलक्याची किनार जरतारी आहे !

आई—मी नोकरीवर होतें, तेव्हा मालकीणीनें दिलेला आहे हा ! इतकीं वर्षं जतन केला होता मुद्दाम ! तसा जुना झाला आहे आता पण......

मुलगी—छान, सुरेख आहे पण ! त्याच्यावर ऊन पडलं, म्हणजे कसा चकाकतो, बघायला हवं तुम्ही '

शेजारीण—उद्या ऊन पडलं, म्हणजे बरं होईल. नाही तर यायचे ढगच ! पाहूं बरं तुला कसा खुलतो.

[मुलगी झगा उचलून हातांनी गळ्यापर्यंत अंगासमोर उभा धरते. शेजारीण दोन पावलें मागे सरकून तिच्याकडे कौतुकाने पाहते]

—छानच दिसतो; प्रश्नच नाही ! अगदी सुंदर ! तुला अशा वेषांत पाहून त्याचे डोळे दिपून जातील, बघ ! चालतां देखील यायचं नाही त्याला मग !

मुलगी—(अगदी भावनाधीन होऊन)–खरंच त्याला अभिमान वाटेल का माझा ?

शेजारीण—अर्थातच ! शंकाच नको !

मुलगी—मागे त्याने मैदानी खेळांच्या स्पर्धेत बक्षीस मिळवलं, तेव्हां त्याला जितका अभिमान वाटला, तितका वाटेल का ?

आई—अलबत्‌ ! खेळांतल्या बक्षिसापेक्षा हें बक्षीस अधिक अभिमानास्पद वाटायलाच हवं ! नक्कीच त्याला अधिक अभिमान वाटेल. समंजस आहे तो—

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शेजारीण—मैदानी खेळांत उंच उडी मारण्याबद्दल बक्षीस पटकावलं होतं त्याने, हो ना ! मी सांगतें, याक्षणीं उद्या प्राप्त होणाऱ्या पुत्राच्या विचाराने चंद्रापर्यंत उंच उड्या मारीत असेल तो ! खरा नशीबवान् आहे !

आई—माझी मुलगी खरोखरच लाखांत एक आहे ! अर्थात् असं मींच म्हणणं योग्य नाही, पण राहवतच नाही !

शेजारीण—काय झालं खरं तेंच म्हटलं म्हणून ! तुम्ही मुलीला दिलं असं शिक्षण देणं, म्हणजे कला आहे ती ! तुम्ही अभिमान बाळगावा, अशीच गोष्ट आहे ही ! असा अभिमान बाळगायचा दुर्दैवाने मला हक्क नाही, ठाऊकच आहे तुम्हांला !

आई—पण तुमचा काय इलाज बरं त्याला ?

शेजारीण—वडतं तें सारं हिताचंच असतं म्हणावं नि निमूट बसावं, हें बरं ! मुली असत्या तरी त्यांना असा बाप आवडला नसता आणि दु:खी झाल्या असत्या !

आई—म्हणजे तो ··· ···

शेजारीण (खिन्नपणाने)–हं !

आई–तुम्हां दोघांत तसं घडायला खरोखरच नको होतं !

शेजारीण (मुलीकडे वळून)–आता त्या तळ्याजवळच्या पांढऱ्या घरांत तुम्ही राहायला जाणार म्हणायचं !

मुलगी (होकारार्थी मान हलवीत)–नशीबानेंच मिळालें तें घर !

आई–छान चिमुकलं घर आहे तें !

शेजारीण–सुरेख आहे अगदीं !

मुलगी–खरंच सुरेख आहे !

शेजारीण–तो चित्रकार नव्हता का आला एक गेल्या वर्षी, त्याने सुंदर चित्र रंगविलं होतं त्या घराचं ! असं वाटायचं की, कॅमेरानेच काढलं आहे जसं कांही !

मुलगी–त्या घरासमोरचं कुरण थेट तळ्याच्या काठापर्यंत जातं आणि घराच्या दोन्ही बाजूला तीं चेरीचीं दोन झाडं आहेत ना, तीं तर इतकीं छान दिसतात !

शेजारीण—फारच सुरेख !

मुलगी—आज पहाटे गेलें मी तिकडे ··· अगदी पहाटे!······ घर पाहायला !

शेजारीण—जायलाच हवं !

मुलगी—सूर्य उगवायचाच होता तेव्हा, आणि धुकं होतं सगळीकडे ! असं वाटलं, स्वप्नांतलंच दृश्य बघतें आहें मी !

शेजारीण—घराला ओल नाही येता कामा पण !

आई (शेगडीवरील भांड्याची आठवण होऊन)–छान ! मी बसलें इथें बोलत आणि तिकडे तें भांडें ... ...

[आई घाईने शेगडीकडे जाते आणि चटकन् भांडें उतरून खाली ठेवल्यावर उजवीकडील दरवाजांतून खोलीबाहेर जाते. शेजारीण टेबलाजवळील खुर्चीवर बसते; मुलगी टेबलाच्या डावीकडे उभी राहते व खोलीच्या पाठीमागील उघड्या दरवाजांतून कांही वेळ बाहेर पाहते. नंतर एकदम कसला तरी निश्चय केल्याप्रमाणें ती शेजारीणकडे वळते]

मुलगी (थोडेसे गोंधळून)—मी तुम्हाला एक प्रश्न विचारला, तर चालेल का ?

शेजारीण—वा ! विचार ना ! परवानगी कशाला हवी ?

मुलगी (आवेशाने)—तुम्ही आपल्या नवऱ्याशीं लग्न का केलंत् ! त्याच्याशींच का केलंत् लग्न ?

शेजारीण (आश्चर्याने)—त्याच्याशींच का लग्न केलं ?

मुलगी—त्याचीच निवड करण्याचं कारण काय ?

शेजारीण(गोंधळून)—कारण... ? ...कारण तशी इच्छा त्याने बोलून दाखवली !

मुलगी—पण तुम्हांला 'नाही' म्हणतां आलं असतं !

शेजारीण—हं !... 'नाही' म्हणूं शकलें असतें मी...खरं आहे !

मुलगी—'नाही' म्हणावेसं का नाही वाटलं तुम्हांला ?

शेजारीण—छान, छान! तो लग्नाची इच्छा केव्हा व्यक्त करतो, असं मला झालं होतं आणि मला 'नाही' म्हणावेसं वाटेल! (किंचित् अंतर्मुख होत) हें बघ, तुझ्याजवळ म्हणूनच बोलतें मी...कुणाला कांही सांगितलं नाही मी असं. (किंचित् अडखळत) एकदा मी एकटी टेकड्या पायाखाली घालीत फ्रॅंशफोर्डला गेलें; तिथल्या एका म्हाताऱ्या बाईजवळून भारलेला ताईत आणला मी एक!

मुलगी—भारलेला ताईत!– कशाला?

शेजारीण—तो मला लवकर वश......त्याने लग्नाची इच्छा लवकर प्रगट करावी म्हणून!

मुलगी—म्हणजे...म्हणजे प्रेम होतं तुमचं त्याच्यावर!

शेजारीण—प्रेम? असेलच!– होतंच!

मुलगी—जेमूवर माझं प्रेम आहे तितकं होतं?

शेजारीण—का नसेल? जगांत प्रेम फक्त तुलाच करतां येतं, असं का वाटतं तुला?— वेडी कुठली!

मुलगी–आणि, त्याचं होतं तुमच्यावर प्रेम?

शेजारीण–अर्थातच होतं! मी सांगतें तुला, त्यावेळीं मी सुरूप दिसायची. माझ्या इतकी सुरेख बायको त्याला भाग्यानेच मिळाली!

मुलगी–तुम्ही आणि तो······मी आणि जेमू सारखं······?

शेजारीण–कांही फरक नाहीं! (भावनाधीन होऊन) त्या एल्मवृक्षांखालून आणि त्या रस्त्यांतून त्याच्याबरोबर जातांना अभिमान वाटला मला! तो आणि मी······मी आणि तो!

मुलगी—अगदी स्वर्गांत असल्यासारखं वाटलं असेल तुम्हांला, नाही का? जसं कांही स्वप्नच पडत होतं एखादं! अतिशय सुखद स्वप्न!

शेजारीण (उसासा सोडून)–खरं आहे!– सुखद स्वप्न!

मुलगी—कारण तुमचं एकमेकांवर प्रेम होतं!

शेजारीण—हं!

मुलगी—आणि, आतां?

शेजारीण (दचकून)-काय?

मुलगी—तो आणि तुम्ही! आता, सध्या?

[एका क्षणांत शेजारणीच्या चेहऱ्यावरील मृदु भावना नष्ट होतात व तिच्या हृदयांत ओतप्रोत भरलेला द्वेष चेहऱ्यावर प्रगट होतो.]

शेजारीण (कठोर आवाजांत)— आता विचारतेस ना? आता हाल, हाल, हाल! खरं सांगतें आहे हें! कुत्रा आणि मांजर अशी अवस्था– कुत्री-मांजरं तरी बरीं! सत्यानाश होवो त्याचा! हें बघ, (बाही वर करून दंडावरचा एक लाल लाल वळ दाखविते) बघ, आता काय तें बघ!

[शेजारीण वक्षःस्थळ उघडें करून दाखवायला लागते, पण मुलीच्या कण्हण्यामुळे तो विचार रहित करते!]

मुलगी—नको! –नका दाखवूं!

शेजारीण—दोघां दिवसांपूर्वी तो कसा वागला तें दाखवणार होतें मी!

मुलगी (कण्हत)—मला पाह्यचं नाही तें! (थोडा वेळ थांबून) आणि, तुम्हांला त्या एल्मवृक्षांखालून जातांना स्वर्गसुख लाभलं? (बाहेर दरवाजांतून दिसणाऱ्या आकाशाची शोभा आतापर्यंत काळवंडायला लागली आहे. मुलगी थोडा वेळ त्या बाजूला पाहते आणि मग एकदम अगदी खचून गेल्यासारखी होऊन टेबलाशीं शेजारणीच्या विरुद्ध बाजूच्या खुर्चीवर तिच्यासमोर बसते.) भयंकर, फारच भयंकर!!

शेजारीण (तिच्या उद्गाराचा पूर्ण अर्थ न समजून)–हं! भयंकर!

मुलगी—दोन व्यक्तींचं परस्परांवर इतकं प्रेम असूनहि ... ...

शेजारीण—हं!

मुलगी—त्या साऱ्या स्वर्गसुखांचं यातनांत रूपांतर व्हायचं!

शेजारीण—पटत नाही मनाला, हो ना?

मुलगी—घडलं कसं पण सगळं हें?

शेजारीण—काय म्हणतेस?

मुलगी—असं कसं झालं?

शेजारीण—मलाहि कळत नाही, बघ! मला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटतं, प्रवाहांत सापडल्यासारखं आमच्या इच्छे-विरुद्ध आम्ही तिकडे वाहत गेलों.

मुलगी—दारूचं व्यसन होतं का त्याला ?... का दुसरी एखादी स्त्री...?

शेजारीण—सर्वांसारखी चार थेंब दारू तोहि प्यायचा, पण दारूच्या नव्हता तो आणि दुसरी स्त्री तर नव्हतीच नव्हती !!

मुलगी—प्रवाहांत...सांपडल्यागत...

शेजारीण— हं !

मुलगी—आणि, प्रेमाचं रूपांतर जळजळीत द्वेषांत झालं असेल ?

शेजारीण—हळू हळू झालं तें ! प्रेम आणि द्वेष यांच्यामधली रेघ दाखवतां नाही यायची ! (थांबून) मला वाटतं, आम्ही एकमेकांपासून फार अपेक्षा केल्या, म्हणून घडलं असं !

मुलगी—म्हणजे काय ?

शेजारीण—समजावून नाही सांगतां यायचं तें, पण अनेक वेळा मला वाटतं असं ! सगळ्या स्त्रीपुरुषांचं असंच ! एक तरुण, एक तरुणी ! खूप खूप प्रेम एकमेकांवर ! दोघांनाहि वाटतं की, आता जगांतल्या सुखांपुढे स्वर्गांतलीं सुखंहि तुच्छ आहेत!–सुख ! स्वर्गसुख !!... लग्न होऊन कांही काळ गेला की, त्यांना हळुहळू जाणीव व्हायला लागते की, प्रेमामुळे आयुष्याचा स्वर्ग बनणं जवळ जवळ अशक्यच आहे! आयुष्यांतले सारे प्रश्न, सारीं इतर दुःखं कांही नुसतं प्रेम करून सुटत नाहीत ...मग लागतात एकमेकांना दोष द्यायला... मग न कळत एकमेकांचा द्वेष ..! मला वाटतं, असंच घडत असावं !

मुलगी—समजलं मला, तुम्ही काय म्हणतां तें !

शेजारीण—व्यक्ति प्रेमांत सांपडली की, आंधळी होते, एखाद्या स्वप्नांत असावं, तशीं असतात तीं आयुष्यांत प्रथम प्रथम ! अर्थात् सुरवातीला चालतं तें. स्वर्गसुख थोडाकाळ का होईना, बहुतेक मिळतंच...पण तें सुख आयुष्य-भर टिकत नाही. आयुष्य व्यापून टाकायला तें असमर्थ ठरतं ! हें सारं दारुड्यासारखंच ! त्याला केव्हा तरी जागं होणं भाग पडतं; सारखं धुंद राहून चालत नाही ! धूळधाण व्हायची नाही तर ! पण जग आहे तसं मानणं फार जड जातं दारुड्याला ! विकृती उत्पन्न होते डोक्यांत ! त्याला तसं सारं कळतं, पण... त्याचा दोष नसतो त्याच्यांत ! तें व्यसनच तसं आहे...अगदीं तसंच या प्रेमाचं ! दारूमुळे मेंदु दुखावला जातो, प्रेमामुळे हृदयाला इजा होते, एवढाच फरक !

मुलगी—मी आणि जेम्—आम्हीहि अशीच स्वतःची फसवणूक करून घेत आहों, असं वाटतं तुम्हांला ?

शेजारीण—तुमची गोष्टच निराळी ! तुमचं प्रेम निःस्वार्थी आहे !

मुलगी—त्याचे दोष मला माहीत आहेत, इतकंच. त्याच्या त्या दोषांमुळेच मला अधिक हवासा वाटतो तो !

शेजारीण (खिन्नपणें)–हं ! असेल असेल !

मुलगी (कांही वेळाने)—हा वसंत ऋतु साऱ्या आयुष्यभर राहील, तर किती बरं होईल ! या दिवसांचा विसर मला कधीहि पडणार नाही ! ... ... पण– पण एका मागून एक ऋतु बदलणारच ! पाऊस, उन्हाळा... थंडीचा कडाका !

शेजारीण—हं, थंडी, रक्त गोठून जाईल इतकी थंडी ... ...

मुलगी—त्या तळ्यांतल्या पाण्यावर बर्फाचे थर जमतील, त्या चेरी वृक्षांच्या फांद्यांवर एक सुद्धां पान राहणार नाही, काळ्या दिसतील त्या फांद्या (हुडहुडी भरल्यासारखें करते)

शेजारीण—थंडी वाजते आहे तुला ! हो ना ?

मुलगी—हो, थंडी...!

शेजारीण—त्या शेगडीजवळ बस जा थोडा वेळ ! मी तुझ्या आईशीं बोलतें थोडं ! (ती उठते आणि मुलीकडे सहानुभूतिपूर्ण दृष्टीने बघते) : आणि, उगीच थंडीचा नको विचार करूंस ! सध्या वसंत ऋतु आहे, खूप आनंदांत राहा !

[मुलीकडे पुन्हा एकदा पाहून शेजारीण उजवीकडील दाराने जाते. सर्व सायंशोभा आका-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांतून नाहीशी झालेली आहे आणि आकाश निस्तेज पडलें आहे. खोलींत आतां पुष्कळच काळोख सांचला आहे. मुलगी त्या काळोखांत उद्विग्न आणि हताश बसलेली आहे.

फार लांबून, दरवाजांतून दिसणाऱ्या टेकड्यांच्याहि मागून मधुर संगिताचे स्वर येतात. अर्थातच ते बरेच अस्पष्ट असतात. थोड्याच वेळांत तें संगीत थांबतें व एक तरुण मनुष्य खोलीच्या पाठीमागील भिंतींतल्या दरवाजांत येऊन उभा राहतो. क्षण दोन क्षण तो तसाच निश्चल उभा राहून खोलीच्या अंतर्भागाचें निरीक्षण करतो. बाहेरील आकाश निस्तेज झाल्यामुळे त्याची आकृति काळी दिसते. या तरुण मनुष्याचें वय एकोणीस वर्षे असून तो उंच व देखणा आहे. त्याचा वेष अगदी सामान्य आहे व त्यावरून तो खेड्यांत राहणारा आहे, हें ओळखतां येतें. कांही वेळाने तो तरुण खोलींत बसलेल्या मुलीचें लक्ष्य वेधून घेण्याकरिता उघड्या दरवाजाच्या फळीवर बोटांनी 'टक्टक्' असा आवाज करतो. मुलगी दचकून उभी राहते व त्याच्याकडे वळते. तो दारांत तसा उभा असलेला बघून तिच्या मुखांतून एक आश्चर्योद्गार बाहेर पडतो.

तरुण (त्याचा आवाज फार प्रेमळ व गोड आहे)—आंत येऊं का मी ?

मुलगी (अगदी गोंधळून)—मी...मी !...

तरुण (त्याची वागण्याची पद्धत देखील फार गोड आहे. कुणालाहि प्रिय होईल असा आहे तो) कदाचित् मी आंत न आलों, तर बरं, असं तुम्हांला वाटत असेल. तसं असेल, तर जातो मी !

मुलगी (अजूनहि ती गोंधळलेलीच आहे)—तसं नव्हे...मी...या ना आंत ! कांही हरकत नाही !

तरुण—आभारी आहे मी !

(तो खोलींत येतो. कांही वेळ दोघांपैकी कुणीच बोलत नाही. नंतर

तिच्याकडे सस्मित मुद्रेने बघत)—तुम्हांला थोडंसं घाबरवलंच मीं असं येऊन !

मुलगी—छे, छे, निदान ...

तरुण—मला कळलं पण ! तुम्हांला असं घाबरवल्याबद्दल खरोखर वाईट वाटतं मला !

मुलगी—क्षणभर मला वाटलं,...मला वाटलं की, तुम्ही तो...तोच आहांत ! अगदी त्यांच्यासारखे दिसतां तुम्ही....बरेचसे तसे तरी दिसतांच.

तरुण (हंसत)—मग तो अगदी सुस्वरूप आहे म्हणायचा !

मुलगी (साधेपणाने)—हो, हो आहेच !

तरुण—आपल्या त्याच्याबद्दलच्या या मताबद्दल त्याच्यातर्फे आभार मानतों मी !

मुलगी—म्हणजे काय ?

तरुण—जाऊं द्या तें !

[पुन्हा कुणीच बोलत नाही. मुलगी थोडा विचार करते आणि तो तरुण स्वतःच्या मनोरंजनार्थ तिची थट्टा करीत आहे, असें तिला वाटतें.]

मुलगी (अगदी तिऱ्हाइतपणें).—पहिल्यांदा उजवीकडे वळून बरंच चालायचं म्हणजे घरं लागतील. थोडसं पुढेच चर्च आहे. चर्चजवळच उजवीकडे पुन्हा वळायचं आणि सरळ जायचं.

तरुण—म्हणजे ? आपल्या बोलण्याचा अर्थ काय ?

मुलगी—असं इतकं चालायला नको असेल, तर ख्रिस्टनालच्या शेतांतून जवळचा रस्ता आहे. पण तिकडून न गेलेलं बरं ! कुत्रीं बांधलेलीं नसलीं, म्हणजे चावायला धांवतात !

तरुण—कुत्रीं ? कुत्रीं ?

मुलगी (थोडेसें त्रासून)—खेड्याकडे जायचा रस्ता विचारायला आलां ना तुम्ही ?

तरुण (स्वस्थपणें)—छे, छे, मुळीच नाही !

मुलगी—मग ?......

तरुण—मग ?......

मुलगी—मग आलां कशाला तुम्ही ?

तरुण—कशाला आलों ? कशालाच नाही सहज आलों. (थोडा वेळ स्तब्ध राहून) या रस्त्याने जातांना सहज त्या खिडकींतून आंत नजर टाकली आणि तुम्ही इथे अशा बसलेल्या दिसल्यात !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[ज्या खुर्चीवर मुलगी बसलेली होती तीवर तरुण तिच्यासारखा बसतो, तथापि मुद्दामच मुलीपेक्षां अधिक खिन्न होतो.]

मुलगी (शांतपणें)-वरंच लक्ष्यांत येतं तुमच्या एका दृष्टिक्षेपांत !

तरुण (उठत)—हं ! अवश्य लक्ष्यांत ठेवतों मी ! मुद्दामच सारं नीट बघतों मी, समजलं ?

मुलगी—सारं ? ज्या गोष्टींशीं तुमचा काडीमात्र संबंध नाही त्याहि ?

तरुण—त्याच गोष्टी तर अगदी स्मरणपूर्वक बघायच्या !—त्याच मजेदार असतात !

मुलगी (टोचून बोलायच्या इच्छेने)—कांही लोक या वर्तनाला असभ्यपणा म्हणायला कमी करायचे नाहीत कदाचित् !

तरुण—फार चांगला प्रघात आहे हा माझा ! त्या लाकडी घोड्याभोंवतीं जमलेल्या ट्रॅाय शहरांतल्या नागरिकांनी असा असभ्यपणा केला असता, तर दुसरा दिवस तसा नसता उगवला ! खरं की नाही ?

मुलगी—कांही समजत नाही मला तुमचं बोलणं !

तरुण—हरकत नाही-पुढे कधी समजेल !

मुलगी—मुद्दामच शिष्टाचार पाळायचे नाहीत, असं ठरवलं आहे का तुम्हीं ?

तरुण (कळवळून)—छे, छे, विचार सुद्धा मनांत आणूं नका तसा ! मी एवढंच म्हणत होतों की, पुढें पुष्कळंच गोष्टी तुम्हांला नवीन कळतील. मी शिकवीन तुम्हांला !

मुलगी—तुम्ही ?—तुम्ही ?

तरुण—हो, मी ! आणि, तुम्ही सुद्धा मला पुष्कळ नवीन नवीन गोष्टी शिकवाल. पुष्कळच गोष्टी !

मुलगी—पुढचं पुढे ! आतां या वेळेला मात्र दोन तीन गोष्टी खास शिकवूं शकेन मी ! तुम्हांला ठाऊक नाहीत त्या !

तरुण (तिच्या टोमण्याला मुळींच महत्त्व न देता)—शक्य आहे, तसंहि असेल ! परंतु तुमच्या जागीं मी असतों, तर आता नांव सुद्धा नसतं काढलं त्या गोष्टींचं ! पुढे कितीतरी वेळ आहे आपल्याला, कितीक वर्षं—आपण दोघंच आणि खूप वेळ !

मुलगी—कितीक वर्षं !......आपण दोघंच ! (बुचकळ्यांत पडून) म्हणजे काय पण ?

तरुण (उत्साहाने)—किती तरी वर्षं, खूप सुखदायक वर्षं !...आणि, आपण दोघं ! सुखच सुख !!......त्या तळ्याच्या काठीं नाही तर त्या चेरीच्या झाडाखाली बसायचं !

मुलगी—चेरीखाली !

तरुण—हो, तिथेच बरं ! सहज त्या झाडावर चढतां येईल.

मुलगी—म्हणजे......म्हणजे ?

तरुण—नेहमी मी त्या झाडावर चढेन, तुम्ही घाबराल आणि मी फांद्यांत लपलों, म्हणजे सारख्या हाकावर हाका माराल. अगदी घाबरून जाल तुम्ही, पण थोडाच उतरणार आहे मी ! मी उलट अगदी शेंड्याकडे जायला निघेन ! खूप खूप घाबरवून सोडायलाच करीन तें ! तुम्हाला रडकुंडीला आणायला ! खरं ना ?

मुलगी—तुम्हांला त्या चेरीझाडांची माहिती कुठे मिळाली ?

तरुण—चेरींची कांही माहिती नाही मला ! एका सुरेख पांढऱ्या रंगाच्या घराच्या दोन्ही बाजूला दोन चेरीचीं झाडं असलीं, तर ती फार छान दिसतात, एवढंच ठाऊक आहे मला !

मुलगी (उसन्या तिऱ्हाइतपणाने)— अस्सं ! तुम्ही खेड्यांत मिळविली होय ही सारी माहिती ?-अस्सं !

तरुण (हसून)-छे, खेड्यांत नाही कळलं कांही !

मुलगी--नाही कसं ?--खासच !

तरुण--खरंच नाही, शपथपूर्वक सांगतों--

मुलगी—असलंच पाहिजे; एरवीं तुम्हांला इतकं......आतापर्यंत इतका वाचाळपणा त्याशिवाय का तुम्ही केला ?

तरुण—वाचाळपणा ? वाचाळपणा नाहीं मीं केला. खरं तेंच सांगितलं. जें सांगितलं तें अगदी सत्य, सत्य आहे !

[मुलगी अधिकाअधिक आश्चर्यचकित होत त्याच्याकडे बघते. तरुणहि तिच्याकडे टक लावून पाहतो. नंतर—]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुलगी (हलक्या स्वरांत)—कोण तुम्ही ?

तरुण (गंभीरपणें)— तुम्हांला-तुला ठाऊक नाही ?

मुलगी (त्याच्याजवळ जात)—कोण ? कोण ?

तरुण—कुणीतरी ... पण अगदी त्याच्या-सारखा...तुझं ज्याच्यावर प्रेम आहे त्याचीच जणूं प्रतिमा...चालती बोलती प्रतिमा !

मुलगी (अधिक जवळ जात)—खरं आहे ! खरंच...अगदी हुबेहूब...

तरुण—किती सुरेख आहेस तूं !–किती छान आहेस !

मुलगी—पण तुम्ही कोण ?–कोण ?

तरुण—त्या पांढऱ्या घराजवळच्या त्या तळ्यांत तीं कमळं आहेत ना, तितकी सुंदर आहेस तूं ! (तिच्या गालाला हळुवारपणें हात लावतो, आणि ती सुखाधीन होऊन डोळे मिटते) —पण मी कोण, हें तूं विचारूं नकोस ! इतक्यां-तच नको विचारूस !

मुलगी (हळू आवाजांत)—इतक्यांतच नको !

तरुण (आज्ञेच्या आवाजांत)—हं ! इथे बस ! मी तुला प्रथम पाहिलं, तेव्हा इथे बसली होतीस तूं ! बस इथेच !

[स्वप्नांत असल्याप्रमाणें ती त्याची आज्ञा पाळते]

—आणि, मी इथे तुझ्या पायांजवळ बसतों !

[ती टेबलाशीं खुर्चीवर बसलेली आहे व तो तिच्या पायाशीं जमिनीवर बसतो]

—छान झालं की नाही आता ? किती सुखी आहों, बघ, आपण ! आता थोडं बोलायचं का आपण ? तूं आणि मी !

मुलगी (त्याच्याकडे बघत)— कशाबद्दल बोलायचं आपण ?

तरुण—कशाबद्दल वरं ?-हं ! मघाशी तूं दुःखी का होतीस ? सांग...मला सांग !

मुलगी—दुःखी ?

तरुण—दुःखीच ! मघाशीं मी आलों, तेव्हा किती केविलवाणी दिसत होतीस तूं !

मुलगी (विस्मयचकित होऊन)— विसरलेंच मीं तें सारं तुमच्या सहवासांत !

तरुण—साहजिकच आहे !

मुलगी—पण...पण मी दुःखीच......

तरुण—का बरं ?

मुलगी—तुम्हांला कसं सांगूं शकेन मी तें ?

तरुण—का नाही ?

मुलगी—तुम्हांला कळायचं नाही तें ! माझ्या दुःखांचं तुम्हांला काय ? (एकंदर परिस्थितीची क्षणांत जाणीव होऊन) आणि, हें पहा, तुम्ही अनोळखी, तुम्हांला खाजगी......

[ती उठून उभी राहायला लागते]

तरुण (तिच्या गुडघ्यावर हात ठेवून तिला बसवूनच ठेवतो)— हें पाहा, त्याची काळजी नको ! पुष्कळ प्रसंगीं अनोळखी व्यक्तीच फार उपयोगी पडते, फार आपलेपणा दाखवते. (तिचें मन वळविण्याकरिता) आणि, एकदा तूं मन-मोकळेपणाने सारं सांगितलंस, म्हणजे मग आपण अनोळखी राहणारच नाही मुळी ! खरं ना ? चांगलं होईल की नाही तें ?

मुलगी (परकेपणाने)—चांगलं होईल !

तरुण—अर्थातच !

मुलगी (निश्चयपूर्वक)—आता आपल्याशीं जास्त बोलायला वेळ नाहीं मला !

[ती उठून उभी राहते]

तरुण (आर्जवी स्वरांत)—पण ...... पण असं पाहा... ..

मुलगी—मला कामं आहेत पुष्कळ !

तरुण (उठून उभा राहून)-म्हणजे मी आता जावं, अशी तुझी इच्छा आहे ? (दुःखाने) आणि, किती छान ओळख व्हायला लागली होती आपली !

मुलगी—मला वाईट वाटतं, परंतु इलाज नाही माझा !

[मुद्दाम बाहेर जाण्याच्या उघड्या दरवाजाकडे बघते]

तरुण—आणखी निदान पाच मिनिटं तरी—

मुलगी (निश्चय डळमळायला लागून)— एखादं लहान मूल हट्टाने झोपी जात नाही, तसंच वागतां आहां तुम्ही !

तरुण (उत्सुकतेने)—मी लहान मूल आहे, असंच समजूं आपण ! आणि, तूं जशी कांही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझी आई ! तूं आई आणि मी तुझा आवडता लहान मुलगा ! आणि, तूं मला म्हण, 'हं, आतां फक्त पांचच मिनिटं हं, मग नाही हट्ट करायचा -तडक जायचं ! '

मुलगी (पराभूत होत)—बरं ! पण फक्त पांचच मिनिटं हं ! एक सेकंद सुद्धा ज्यास्त मिळायचा नाही ! कबूल आहे का ?

तरुण—चालेल ! चालेल ! चल मघासारखं पुन्हा बसूं आपण ! (दोघेहि पुन्हा पूर्वीसारखीं बसतात) सांग आता गोष्ट ! एक छान गोष्ट सांग मला !

मुलगी—गोष्ट ?

तरुण—हो, लहान मुलांना आवडतात तशी एखादी गोष्ट सांग ! सगळ्या लहान मुलांना निजण्यापूर्वी त्यांच्या आया तशा गोष्टी सांगतात तूं मला सांग !

मुलगी—पण तुम्ही......तुम्ही......पण... पण तूं लहान का आहेस ?

तरुण—वयाचा काय प्रश्न ? लहानांना आवडतात त्या गोष्टी मोठ्यांनाहि आवडतात—आवडायच्याच !

मुलगी—पण मला तशी गोष्ट कुठे येते आहे ?

तरुण (हट्टीपणाने)—येते ! येते !

मुलगी—खरंच येत नाही, बघ ! मी विसरून गेले आहे त्या गोष्टी !

तरुण—मग नवीन सांग एखादी ! सांगतां सांगतांच जुळवून सांग !

मुलगी—तें कसं जमेल मला ? तितकी हुशारी नाही माझ्याजवळ !

तरुण—पण तसा प्रयत्न केला आहेस का तूं कधी ?

मुलगी—अंहं !

तरुण—मग तें जमणार नाही का म्हणतेस ? (हट्टाने) सांग, सांग ना !

मुलगी (विचार करीत)—बरं ! आठवूं दे हं, पण......

तरुण—मी सुरवात करून देऊं का गोष्टीची ?

मुलगी—बरं होईल तें !

तरुण—हं ! गोष्ट सुरू, हं ! (हावभाव करीत) एकदा काय झालं......सांग आता तूं !

मुलगी—एकदा काय झालं की......की...

तरुण—की एका......एका......हं, पुढे ?

मुलगी—एका राजकन्येचं ...... राजकन्या कशाला हवी पण......एका साध्याभोळ्या मुलीचं असं म्हटलं, तर चालेल तुला ?

तरुण—हो ! न चालायला काय झालं ? सांग पुढे......

मुलगी—एका साध्याभोळ्या मुलीचं प्रेम...

तरुण—अंहं, असल्या गोष्टींत प्रेम वगैरे कशाला ? लग्न बरं !

मुलगी—असा अडथळा नको आणूंस बरं मधे ! तर काय झालं की, तिचं लग्न एका......

तरुण—राजपुत्राशीं ?

मुलगी—छे, एका...

तरुण—समजलं, एका साध्या, गरीब मुलीचं लग्न एका साध्या, गरीब तरुण मनुष्याशीं व्हायचं ठरलं ! हो ना ?

मुलगी—बरोबर ओळखलंस ! तो तिला खूप आवडायचा. तेव्हा त्याच्याशीं लग्न ठरलं, म्हणून तिला खूप खूप आनंद झाला...

तरुण (उत्सुकतेने)—पुढे काय झालं ?

मुलगी—त्या आनंदाच्या भरांत ती रोज सकाळ-संध्याकाळ पक्षांचा किलकिलाट ऐकत बसायची...

तरुण—कुठले पक्षी होते ते ?

मुलगी—अरे, खूप वेगवेगळ्या जातीचे छान छान रंगांचे होते ते पक्षी...

तरुण—हिरवे हिरवे पोपट होते का त्यांत ?

मुलगी—हो तर, आणखी सुद्धा किती तरी तऱ्हेचे पक्षी होते त्यांत ! आणि, त्या पक्ष्यांचं गाणं ऐकत ती बसली की, तिला वाटायचं, आपण किती किती सुखी आहों !

तरुण—पण का ग ! ते पक्षी होते कुठे ?

मुलगी—सगळीकडे होते. पक्षीच पक्षी ! इकडे होते, तिकडे होते...

तरुण—पिंजऱ्यांत होते ते ?

मुलगी—पिंजऱ्यांत नव्हते...बगीच्यांत होते एका......

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरुण—तिचा होता तो बगीचा ?

मुलगी—किती प्रश्न विचारतोस रे ? गोष्ट ऐकायची आहे ना तुला ? मग असं बोलायचं नाही मधें ! खूप मोठा होता तिचा बगीचा, आणि त्यांत सगळीकडे सुरेख सुरेख फुलं होतीं !

तरुण—लाल फुलं होतीं ?

मुलगी—हो !

तरुण—पिवळीं ? –निळीं ? –जांभळीं ? गुलाबीं ? आणि, हिरवीं फुलं होतीं का ग त्यांत ?

मुलगी—हो तर ! एवढ्यानेच काय झालं ? आणखी सुद्धा निरनिराळ्या रंगांचीं छान-छान फुलं होतीं तिच्या बगीच्यांत !

तरुण—तिचा बगीचा होता, आणखी काय काय होतं ग तिचं ?

मुलगी—आणखी ना ? आणखी ... तिचा एक पांढरा शुभ्र झगा होता आणि त्या झग्यावर किती तरी रत्नं होतीं लावलेलीं ! असा चकाकायचा तो ! चकचकाट ! ती इकडे वळली की, चक ! तिकडे वळली की पुन्हा चक व्हायचं !– डोळेच दिपायचे बघणाऱ्यांचे !

तरुण—आणि, खूप सुखांत होती ती, नाही का ?

मुलगी—हो ना. पण कांही दिवसांनीं काय झालं की—

तरुण—काय झालं ?

मुलगी—तिचं लग्न होणार होतं त्याच्या आदल्या रात्रीं......

तरुण—काय झालं ?

मुलगी—मला नाही सांगतां येत ! सांगवत नाही !

तरुण—सांग ना.

मुलगी—छे, फार फार वाईट घडलं कांही तरी—!

तरुण—सांग, सांग !

मुलगी—तिला कळलं की, लग्न ठरल्यापासून तिच्यावर कुणी तरी मंत्र टाकला होता. त्या मंत्राच्या शक्तीमुळे ती सदा स्वप्नांतच असायची आणि तिच्या त्या बगीच्यांत हिंडतांना तिला भोवतालचं सारं स्वर्गांतून उतरल्यासारखं वाटायचं! तीं झाडं, पक्षी हीं सारीं या जगांतलीं नव्हतींच जशीं कांही ! आपलं लग्नानंतरचं आयुष्य खूप सुखांत जाईल, असेंच विचारीला दिवसरात्र वाटायचं !

तरुण—आणि, मग तो मंत्र काढून घेतल्यावर...... ?

मुलगी—हं, त्या आदल्या रात्रीं ती एकदम त्या मंत्रांतून मुक्त झाली आणि मग जेव्हा तिने इकडे तिकडे पाहिलं, तेव्हा काय दिसलं तिला ? सगळीकडे कुरूपता, पडकीं घरं, निराशा, कुणी कण्हतं आहे, विव्हळतं आहे, यातना.....

तरुण—चांगलं नाही झालं हें ! दुसऱ्याच दिवशीं विचारीचं लग्न आणि आदल्या रात्रींच असं झालं ?

मुलगी—त्या बगीच्यांत तर एकदम सगळीकडे उंच उंच गवत वाढलं आणि त्या गवताच्या चिवट पात्यांनी साऱ्या फुलांना बांधून टाकलं ! पाकळी न् पाकळी मेली मग ! पक्ष्यांना तर किलबिल् करतांच येईना ! त्यांच्या चोंची कुणीतरी जशा बांधूनच टाकल्या होत्या !

[तरुण अति दुःखित मुद्रेने मुलीकडे पाहतो. पण तिचें त्याच्याकडे लक्ष्य नसतें. ती आपल्याच विचारांत त्याचें अस्तित्व विसरते.]

तरुण (कांही वेळाने)—मग पुढे काय झाल त्या मुलीचं ?

मुलगी—काय झालं ? कुणाचं काय झालं ?

तरुण—अग, त्या मुलीचं ? त्या गरीब साध्याभोळ्या मुलीचं ?

मुलगी—तें नाही मला ठाऊक !

तरुण—माहीत आहे तुला ! अशी अर्धीच गोष्ट सांगतात वाटतं ! प्रत्येक गोष्टींत तर असतं की, मग तीं खूप सुखांत राहूला लागलीं ! तीं दोघं सुखाने कालक्रमणा करूं लागल्याशिवाय गोष्ट संपेलच कशी ?–तो आणि ती ! खूप सुख मिळालंच पाहिजे त्यांना !

मुलगी—मलाहि तसंच वाटायचं रे ! पण आता.....

(मुलीला शेजारणीने सांगितलेलें सारें आठ-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

वायला लागल्यामुळे ती अतोनात खिन्न होते. मुकाट्याने ती खुर्चीवरून उठते व खोलीच्या पाठीमागील भिंतींतल्या दरवाजाजवळ जाऊन, खोलीकडे पाठ करून बाहेर बघत उभी राहते. तरुण मनुष्यहि उठून उभा राहतो व एकदीड मिनिटें तिच्याकडे पाहत विचार करतो. त्याच्या वागण्यांतली बालिशता नाहीशी होऊन तिची जागा गांभीर्याने घेतली आहे.)

तरुण—मला तुझ्याशीं कांही बोलायचं आहे!

मुलगी (हळूहळू त्याच्याकडे वळून)—काय?

तरुण—कांही बोलायचं आहे मला तुझ्याशीं! इकडे जवळ ये! (ती किंचित् नाखुषीने दोन तीन पावलें त्याच्याकडे जाते) आणखी जवळ ये! (ती हळूहळू त्याच्याजवळ जाते.) माझी भीति वाटते तुला? भीति वाटते का?

मुलगी—अंहं! भीति नाही वाटत!

तरुण—पण समज, माझ्याऐवजीं दुसराच कुणी असा खोलींत आला असता, तो कोण, कुठला कांही तुला ठाऊक नसतं, तर मग भीति नसती का वाटली तुला!

मुलगी—वाटली असती थोडी फार!

तरुण—तो आणि तूं आपण बसलों होतों तशीं बसलां असतांत? मला तूं गोष्ट सांगितलीस तशी त्याला सांगितली असतीस?

मुलगी—मुळीच नाही!

तरुण—पण...मला मात्र...

मुलगी—पण तो दुसरा मनुष्य अनोळखी, तिऱ्हाईत नसता का?

तरुण—मी अनोळखी, परका नाही का?

मुलगी (त्याच्याकडे आश्चर्याने पाहात)—तुझ्याबद्दल तसं नाही वाटत? तूं अगदी ओळखीचा वाटतोस!

तरुण—मी परका नाही?

मुलगी—छे, मुळीच नाही. तूं प्रथम खोलींत आलास, तेव्हांच मला वाटलं की... की....

तरुण—काय वाटलं?

मुलगी—की, तुझी माझी ओळख अनेक वर्षांपासून आहे!

तरुण—असं वाटलं तुला?

मुलगी—समजावून नाही सांगतां यायचं तें—पण मला तुझ्याशीं पहिल्यांदा ओळख झाली तो दिवसहि आठवल्यासारखा वाटला!

तरुण—सांग मला सारं.

मुलगी—अगदी लहान होतें मी तेव्हा! नाताळांतली सकाळ होती ती! माझ्या आई-बापांनी बिछान्याजवळ येऊन मला जागं केलं आणि माझ्या हातांत एक बाहुली दिली! नाताळांतलं बक्षीस होतं तें! इतका आनंद झाला मला, मी खूप हंसलें, त्या बाहुलीला हृदयाशीं धरून खूप मुके घेतले... माझे आईबाप जवळ उभे राहून माझ्याकडे हसत पाहात होते. आणि, मग......

तरुण—काय झालं मग?

मुलगी—मला एकटीला खोलींत टाकून तीं दोघं पुन्हा बाहेर गेलीं. मी आनंदामुळेच थकल्या-सारखी झालें आणि उशीवर डोकं ठेवून स्वस्थ पडून राहिलें. बाहेर बर्फ पडत होतं आणि सगळीकडे अगदी शांत होतं. मीं डोळे झांकून घेतले आणि त्या बाहुलीला छातीशीं घेतलं! आणि, त्या क्षणीं इतकं समाधान वाटलं मला! कांही तरी चमत्कार होऊनच मला तशी शांति, तें सुख, तें समाधान प्राप्त झालं होतं, असं वाटलं! त्याच्यापेक्षा जास्त सुख कुणालाहि मिळणें शक्य नाही! (थांबून) आणि, आज—मी त्या खुर्चीत बसलें होतें आणि तूंहि माझ्या पायांजवळ गुडघे टेकून बसलेला होतास तेव्हां ··· तेव्हाहि असं वाटलं की, तो पूर्वीचाच चमत्कार पुन्हा घडून मला शांति, सुख, समाधान देत आहे! (हलक्या आवाजांत) ...आणि, असं वाटलं ... असं वाटलं की, तो चमत्कार ... तो सुखद चमत्कार...तें गोड गोड रहस्य म्हणजे ... ... तूं ...तूं...तूं!

[लांबून बाहेरच्या टेकड्यांच्याहि मागून पूर्वीसारखेंच गोड पण अस्पष्ट संगीत ऐकूं येतें. तरुण मनुष्य व मुलगी कांही वेळ निःशब्द बसतात. नंतर—]

तरुण—तुझं म्हणणं खरं नाही! तूं म्हणतेस तसं नाही!

मुलगी—म्हणजे !

तरूण—तें गोड रहस्य म्हणजे मी नव्हे, मी केवळ त्या रहस्याची चाहूल आहे! तो चमत्कार घडून यायला अजून कांही काल जायला हवा! तोंपर्यंत वाट पाहावी लागेल तुला! तुझा तो रत्नें जडवलेला पांढरा झगा घाल व पुन्हा एकदा त्या तुझ्या मोहक फुलें आणि सुरेख पक्षी असलेल्या बगीच्यांत जा. तिथे तें गवत नाहीं आता, सुसर्ती फुलें आहेत. आणि, पक्ष्यांचा किलबिलाट सुरू आहे. तिथे जा आणि वाट पाहा!

मुलगी— वाट पाहूं ! -

तरुण—फार वेळ वाट पाहावी लागणार नाही. अगदी थोडा काल, अगदी थोडा, हं ! आणि मग-मग तो गोड सुखद चमत्कार ! पुन्हा पूर्वीप्रमाणेच बाहेरून संगीतध्वनी येतो. या वेळेला तो अधिक काळ मात्र टिकतो, जणू कुणाला तरी बोलावीत आहे !]

— जातों मी ! जायलाच हवं आता !

मुलगी—मला सोडून जाणार तूं !

तरुण—जायलाच हवं ! पण पुन्हा लवकर—अगदी लवकर परत येईन मी आणि मग......

मुलगी—आणि, मग......

[तो तिचा हात आपल्या हातांत घेतो व तीं दोघंहि बाहेर पडण्याच्या दरवाजापर्यंत जातात. तिथे एकमेकांकडे टक लावून पाहात तीं कांही वेळ थांबतात. तो तिच्या खांद्यावर हात ठेवून तिचें चुंबन घेतो.]

तरुण—आई ! जातों मी !!

मुलगी—जा हं, बाळ ! पण लवकर अगदी लवकर, धावत ये, हं ! मी वाट पाहीन !

[तो दारांतून बाहेर जातो. ती खूप समाधानी व आनंदी दिसते. सौख्याचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजे ती !!]

— प ड दा —

• • •

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी, एम्. ए.
सरचिटणीस वि. सा. संघ यांजकडून

विदर्भ साहित्य संघ, अमरावती
सन १९४६ चा अहवाल

विदर्भ साहित्य संघाचा १९४५ सालचा अहवाल दर्यापूर येथे भरलेल्या नवव्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या वेळीं, मुद्रित स्वरूपांत सभासदांना सादर करण्यांत आलाच होता. त्या अहवालांत डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली अकोट (जि. अकोला) येथे मार्च ३०, ३१ व १ या तारखांस भरलेल्या आठव्या अधिवेशनापासून दर्यापूर (जि. अमरावती) येथे ता. २३, २४ व २५ डिसें. १९४५ या दिवसांत प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या नवव्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अधिवेशनापर्यंतचा संघाच्या कार्याचा आढावा घेण्यांत आला होता. आज या अहवालांत त्यानंतर पुसद (जि. यवतमाळ) येथे भरणाऱ्या दहाव्या अधिवेशनापर्यंतचा वि. सा. संघाच्या कार्याचा आढावा सभासदांना सादर करण्यांत येत आहे.

दर्यापूरचें विदर्भ साहित्य संमेलन

वर उल्लेखिल्याप्रमाणे विदर्भ साहित्य संमेलनाचें नववें अधिवेशन दर्यापूर (जि. अमरावती) येथें प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २३, २४ व २५ डिसेंबर १९४५ या तारखांस मोठ्या थाटाने व उत्साहाने पार पडलें. या संमेलनप्रसंगीं अध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी, उद्-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घाटक न्या. मू. डॉ. सर भवानी शंकर नियोगी व स्वागताध्यक्ष श्री. बाबासाहेब सांगळोदकर, पाटील यांचीं भाषणें विद्वत्ताप्रचुर व वि. सा. संघाला कार्याची नवी दिशा लावणारीं अशींच झालीं. हीं भाषणें त्यावेळीं वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालींच होतीं. या सम्मेलनांतील सुप्रसिद्ध नाटककार व प्रथितयश साहित्यिक श्री. मामा वरेरकर व या प्रांतांतील विद्वान् पुढारी व प्रभावी वक्ते आचार्य दादासाहेब धर्माधिकारी यांचीं झालेलीं भाषणें व 'काव्य, नाटक, कादंबरी, व लघुकथा या ललित वाङ्मय-प्रकारांत सर्वांत अधिक प्रभावी वाङ्मय-प्रकार कोणता?' या विषयावर प्रांतांतील विद्वानांनी केलेली अतिशय मनोरंजक व उद्बोधक चर्चा विशेष उल्लेखनीय आहे. या सम्मेलनाने मंजूर केलेले ठराव सम्मेलनानंतर वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलेच होते. या ठरावांत भाषावार नभोवाणी केंद्र, प्रसिद्धि खात्यांत भाषांतरासाठी मराठी विभाग, मराठी भाषेच्या सेवेची विधायक अष्टसूत्री, भाषावार प्रांतरचना, प्राथमिक शाळांतील मातृभाषाशिक्षणपद्धति, साक्षरता-प्रसार, सुलभ वाङ्मयनिर्मिति इत्यादि विषयांवर मंजूर झालेले ठराव विशेष उल्लेखनीय आहेत.

ठरावाच्या अंमलबजावणीचा अहवाल.

दर्यापूर येथील वि. सा. सम्मेलनाच्या नवव्या अधिवेशनाचें हें वैशिष्ट्य होतें की, अकोट सम्मेलनाने नेमलेल्या घटना-समितीने तयार केलेल्या व त्या वेळच्या विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या घटनेप्रमाणे हें पहिलें अधिवेशन भरलें होतें. हें अधिवेशन अतिशय शिस्तीने, वक्तशीरपणाने व वैभवाने पार पाडण्यांत दर्यापूरच्या स्वागत समितीने जें यश मिळविलें त्याबद्दल स्वागत समिति धन्यवादास पात्र आहे. विशेषतः रा. प्र. ना. खोडे, रा. सांगळोदकर पाटील, रा. भाऊसाहेब खेर, रा. श्रीवास्तव, रा. महाजन, रा. धर्माधिकारी आणि उपसमितींचे सर्व चिटणीस यांचा विशेष गौरवाने उल्लेख केला पाहिजे.

अहवाल वर्षी झालेल्या निवडणुकीच्या वेळीं मतदानास पात्र असलेल्या सभासदांची संख्या खालील प्रमाणे होती. यांत १९४५ सालीं झालेल्या पण बाकीदार असलेल्या सभासदांचा समावेश करण्यांत आला नाही.

१. हितचिंतक सभासद [२५० रु. देणारे]	......१
२. तहाहयात सभासद [१०० रु. देणारे]	......५
३. साधारण सभासद वर्ग पहिला [दर वर्षी ५ रु. देणारे] ('युगवाणी'चे वर्गणीदार धरून)	..२१७
४. साधारण सभासद वर्ग दुसरा [दर वर्षी २ रु. देणारे]	.....१३५
एकूण	...३५८

यावरून संघाची उपयुक्तता पटून संघाची लोकप्रियता सारखी वाढत आहे हें सर्वांच्या निदर्शनास येईलच.

संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सभा

अहवाल वर्षी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या ९।१२।४५, २३।१२।४५, २५।१२।४५, १६।१।४६, २।४।४६ व १८।८।४६ या तारखांना एकूण सहा सभा झाल्या. त्यापैकीं पहिल्या दोन सभा या जुन्या कार्यकारी मंडळाच्या आहेत. पण मागे प्रसिद्ध झालेल्या अहवालांत त्या सभांचा उल्लेख येऊं न शकल्यामुळे या अहवालांत त्यांचा उल्लेख करण्यांत आला आहे. या सभा भरून ठरावांची अंमलबजावणी, संघाचीं नित्य आणि नैमित्तिक कार्ये, संघाच्या साहित्य-विषयक चळवळी इत्यादि अनेक विषयांबाबत कार्याची दिशा ठरविण्यांत आली.

वि. सा. संघाच्या साधारण सभा

मागील अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून पुढील काळांत संघाची एक साधारण सभा झाली. ती दर्यापूर येथे ता. २४-१२-४५ रोजीं सम्मेलन-प्रसंगीं भरलेली होय. या सभेत संघाचा ४५ सालचा अहवाल व जमाखर्च आणि संघाच्या घटनेंत सुचविण्यांत आलेल्या कांही दुरुस्त्या मंजूर करण्यांत आल्या. अमरावती येथे अशाच कांही घटना-दुरुस्तीच्या कामासाठीं जी दुसरी सभा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता. ३-२-४६ रोजीं बोलावण्यांत आली होती, ती पुरेशा गणसंख्येच्या अभावीं भरूं शकली नाही.

वि. सा. संघाचें मुखपत्र ' युगवाणी '

वि. सा. संघाचें मुखपत्र 'युगवाणी' या मासिकाच्या प्रकाशनाचा प्रारंभ हें या वर्षांतलि संघाच्या कार्याचें उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. गेल्या अहवालांत विदर्भांतील नामवंत साहित्यिक, टीकाकार व कवि रा. वामन नारायण देशपांडे यांच्या संपादकत्वाखालीं संघातर्फे ' युगवाणी ' नांवाचें मासिक सुरूं होणार असल्याचा संकल्प जाहीर करण्यांत आला होता, हें सर्वांना विदितच आहे. त्याप्रमाणे एप्रिल महिन्यापासून ' युगवाणी 'च्या प्रकाशनाला प्रत्यक्ष आरंभ झाला. या मासिकाच्या प्रकाशनाला हिंदुस्थान सरकारकडून परवानगी यावयाला कल्पनेबाहेर विलम्ब झाल्यामुळे, संघाला एप्रिलमध्ये पहिला—म्हणजेच जानेवारीचा अंक प्रसिद्ध करावा लागला. त्यामुळे ' युगवाणी 'चे अंक स्वाभाविकपणेंच मागसले. त्यांत पुन्हा अमरावतीला प्रेस कामगारांच्या संपाची दोनदा लाट उसळून, छापखाने दोनदा पुष्कळ दिवसांकरितां बन्दच राहिले. आधीच प्रकाशनाच्या परवानगीला अपेक्षेबाहेर उशीर आणि त्यांत पुन्हा संपाचें वारें! यामुळे यंदा ' युगवाणी 'च्या प्रकाशनांत नियमितपणा मुळी उरलाच नाही. कार्यकारी मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनाच्या बाबतींत स्वसामर्थ्यानुरूप अत्यंत काळजी घेण्यांत जरी कसूर केली नाहीं, तरी झालेल्या अनियमितपणाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करणें कार्यकारी मंडळाला आपलें कर्तव्य वाटतें.

संमेलनाच्या तारखेपर्यंत ' युगवाणी 'चे आक्टोबरपर्यंतचे अंक प्रसिद्ध झाले. आणि नोव्हेंबर डिसेंबरचा जोड अंक ता. १३ जानेवारी १९४७ रोजीं सभासदांच्या आणि वर्गणीदारांच्या हातीं देऊन कार्यकारी मंडळ आपल्या जबाबदारीतून मुक्त झालें आहे. वर उल्लेखिलेल्या अडचणींमुळे ' युगवाणी 'चे अंक पुढेमागे झाले, पण बारा अंकांचा मजकूर सुमारें ९ महिन्यांच्या अवधींत वाचकांच्या हातीं कार्यकारी मंडळ देऊं शकलें, हीं गोष्ट सभासदांस समाधानकारक वाटेल अशी आशा आहे.

' युगवाणी 'ने अत्यंत अल्पावधींत वाङ्मयक्षेत्रांत जें नांव मिळविलें आहे, त्याचें सारें श्रेय मासिकाचे संपादक व कार्यकारी मंडळाचे कर्तव्यतत्पर सभासद रा. वामन नारायण देशपांडे यांच्याकडे आहे. ' युगवाणी 'ला विशिष्ट वाङ्मयीन दर्जा प्राप्त झाला तो त्यांच्यामुळेच. ' युगवाणी 'चा खप हळू हळू वाढत आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी सध्या असलेली सभासदांची व वर्गणीदारांची संख्या मासिकाच्या खर्चाची तोंडामिळवणी करावयाला अर्थातच अपुरी पडते. मासिकाच्या प्रकाशनाची आर्थिक व व्यवस्थापकीय जबाबदारी पतकरणारे कोणी प्रकाशक भेटल्यास संघाला या जिकिरीच्या कामांतून मोकळे होतां येऊन इतर कार्याकडे लक्ष देण्यास अधिक अवसर मिळेल अशी कल्पना निघून त्याप्रमाणे प्रयत्न करण्यांत आला. तो प्रयत्न यशस्वी होऊन अमरावतीचे सुप्रसिद्ध प्रकाशक श्री. द. ना. ठाकूर यांनी मासिकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्याचें पुसद येथील संमेलनाच्या प्रसंगीं जाहीर करण्यांत आलें, हें कळविण्यास आनंद वाटतो.

सुलभ वाङ्मय निर्मिति : समितीचें कार्य

दर्यापूर सम्मेलनाने मंजूर केलेल्या सहाव्या ठरावाप्रमाणे सुलभ वाङ्मय निर्मितीच्या कार्यासाठी कार्यकारी मंडळाने नेमलेल्या समितीचें आमंत्रक व चिटणीस प्रा. वामन कृष्ण चोरघडे यांनी याबाबत घेतलेले परिश्रम साभार उल्लेखनीय आहेत. या समितीने कार्याची निश्चित रूपरेषा आखली, या योजनेप्रमाणे संघातर्फे जीं लहान लहान आणि बहुजनसमाजाला समजतील व त्यांना हिताचीं वाटतील अशीं प्रकाशनें बाहेर पडतील त्यांसाठी विषय निश्चित केले, तज्ञ साहित्यिकांशीं पत्रव्यवहार केला आणि कांही कांही लेखक व त्यांचे पुस्तकांचे विषयहि निश्चित केले. लेखकांकडून पुस्तकें प्रत्यक्ष लिहून अद्याप आलीं नाहीत. या समितीने चालविलेल्या कार्याला लवकरच प्रत्यक्ष फळ येईल अशी आता खात्री वाटत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खेडोपाडीं वाङ्मयाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने आणि ग्रामीण जनतेला उपयुक्त होईल अशा विषयांची माहिती तिला देण्याच्या दृष्टीने संघाची ही योजना विशेषत: ग्रामीण जनतेच्या हिताची ठरेल याबद्दल शंका वाटत नाही. पण ' सर्वारंभास्तंडुला: प्रस्तमूला: ' या न्यायाने एवढी मोठी योजना अमलांत आणावयाची म्हणजे जनतेच्या आश्रयाशिवाय संघाला अगदी अशक्य आहे. सरकारच्या ग्रामसुधारणा योजनेलाहि संघाच्या या योजनेनें चांगलाच हातभार लागेल अशी खात्री असल्यामुळे वि. सा. संघाने ता. ६-११-४६ रोजीं सरकारी ग्रँटकरिता प्रांतिक सरकारकडे अर्ज रवाना केला आहे. त्या अर्जाचा सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करील अशी संघाला उमेद वाटते.

' आगरकर चरित्र ' वाङ्मय समितीचें कार्य

वर्धेचे रा. रिषभदास रांका यांनी ' आगरकरांचें जीवनकार्य ' या विषयावर नवीन पिढीला मार्गदर्शक होईल असा एक आदर्श ग्रंथ मराठींत निर्माण व्हावा यासाठीं लेखकाच्या बक्षिसासाठीं रु. ५०० वि. सा. संघाच्या स्वाधीन केले याबद्दल संघ रा. रिषभदास रांका यांचा खरोखरच ऋणी आहे. जगांत लक्ष्मी पुष्कळांजवळ असते, पण सरस्वतीचे त्यांना क्वचितच वेड असतें. रा. रिषभदास रांका हे अर्थातच या विधानाला अपवाद आहेत. रा. रिषभदास रांका यांच्या देणगीने संघालाहि उत्तेजन मिळालें आणि या कार्याकरिता संघाने एक स्वतंत्र समिति नेमली. प्रा. वा. कृ. चोरघडे हेच त्या समितीचे चिटणीस आहेत. या समितीने जाहीर पत्रक काढून वरील विषयावरील प्रबंध लिहिण्याची सर्व महाराष्ट्रीय लेखकांना विनंती केली आणि आपापल्या प्रबंधाची रूपरेषा—आणि विशेषत: पहिलें प्रकरण लिहून समितीकडे पाठविण्यासंबधी इच्छा प्रदर्शित केली. त्यावरून कांही लेखकांनी मजकूर पाठविलाहि. पण त्यांपैकी कोणाचेंच लिखाण अपेक्षित दर्जापर्यंत पोचणारें वाटलें नाही. म्हणून कांही अधिकारी लेखकांना याबाबत विनंती करण्याचें समितीने ठरविलें. त्याप्रमाणें पत्रव्यवहार करण्यास प्रा. चोरघडे यांनी प्रारंभ केला आहे.

मराठी वाङ्मयविषयक परीक्षा

विदर्भांतील अनेक संस्थांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून, विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या ता. १८।८।४६ च्या सभेंत, अभ्यासक्रम निश्चित करून, अशा तऱ्हेच्या मराठी वाङ्मयविषयक परीक्षा संघातर्फे घेऊन, मराठी भाषेच्या अभ्यासाची गोडी विद्यार्थ्यांच्या अन्त:करणांत वाढविण्याचा निर्णय घेतला. इतकेंच नव्हे तर, या कार्यासाठी एक परीक्षा समिती व एक अभ्यासक्रम समितीहि निश्चित केली. या समितींनी परीक्षेसाठी नियम व अभ्यासक्रमहि मुकर केला. पण संघाला हा निर्णय घ्यावयाला त्या मानाने थोडा उशीर झाला, म्हणून खटपट करूनहि या परीक्षा यंदाच घेणें संघाला शक्य झालें नाही. पुढील वर्षापासून या परीक्षा निश्चितपणें सुरू होतील.

अहवाल वर्षी कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांनी सरचिटणिसाला जें सहकार्य दिलें त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्यावाचून मला कसें राहवेल !

या अहवालाबरोबरच संघाचा १९४६ सालचा जमाखर्चहि सभासदांना सादर करण्यांत येत आहे.

आज डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. सरनाईक, रा. बळीरामपंत एकबोटे, रा. शंकरराव सरनाईक इत्यादि उत्साही कार्यकर्ते आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रचंड उत्साहामुळे पुसद (जि. यवतमाळ) येथे दहावें विदर्भ साहित्य सम्मेलन भरत आहे. या सम्मेलनासाठी आणि संघाच्या वर्षभराच्या कार्यासाठीहि सुप्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार व ' भवितव्या ' चे संपादक श्री. पु. य. देशपांडे ह्यांची सर्व संघसभासदांनी निवड केली आणि या सम्मेलनाचें उद्घाटन करण्यासाठी वीर वामनराव जोशी यांच्यासारख्या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ साहित्यिकाची व विदर्भाच्या नेत्याची स्वागतमंडळाने योजना केली हा केवळ अपूर्व योगायोगच नव्हे, तर वि. सा. संघाच्या प्रगतीला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शुभशकुनच झाला आहे, असें म्हणणें भाग आहे.

असो, शेवटीं महाविदर्भातील सर्व साहित्यप्रेमी जनतेचा जिव्हाळ्याचा पाठिंबा मिळून, संघ दिवसेंदिवस अधिकाधिक कार्यक्षम होईल अशी आशा प्रगट करुन मी हा लांबलेला अहवाल आटोपता घेतों.

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, अमरावती.

अमरावती
ता. ४-११-४७

संघाचें अध्यक्षपद सोडतांना सभासदांना व्यक्तिशः दोन शब्द निवेदन करणें इष्ट वाटतें. सार्वजानिक संस्था म्हणजे अनेक व्यक्तींचा यळकोट मल्हार असतो. सर्वांनी मिळून एकोप्यानें कार्याची टळी उचलली म्हणजे कामें पुढे चालूं लागतात. एकटा मनुष्य अकिंचित्कर असतो. सर्वांनी मिळून गावयाच्या या बहुमेळ परंतु एकसुरी संगीतांत कोणाचा बदसूर लागला कीं विरस होतो व विचका व्हावयास वेळ लागत नाही. विदर्भ साहित्य संघाच्या गेल्या वर्षाच्या कारभारांत कार्यकारी मंडळामध्यें एकोपा चांगलाच राहिला हें सांगण्यास मला समाधान वाटते. झालेल्या कामामध्ये दोष काढणे सोपें आहे व यापेक्षा पुष्कळ अधिक कार्य व्हावयास पाहिजे होतें हें म्हणणें तर त्याहूनहि सुलभ आहे. कामांतील दोष व उणिवा खुद्द मलाच जितक्या सांगतां येतील. तितक्या इतर कोणासहि सांगतां येणार नाहीत. अडचणी तर आल्याच, पण त्या जमेस धरुनहि आमच्याकडून जितकें व्हावयास पाहिजे होते, किंबहूना आम्हीं स्वतःच जितकें स्वतःकडून अपेक्षिलें होतें, तितकें काम झालें नाही. याबाबतींत माझा स्वतःचा कमीपणा मला सर्वांत अधिक जाणवतो.

कार्यकारी मंडळाच्या इतर सभासदांनी काम इमानेइतबारें केलें. संघाचे सर चिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांच्यावर इतर जबाबदाऱ्या मोठ्या असूनहि त्यांनी संघाचें काम कळकळीने व उत्साहाने केलें. संघाच्या कार्याचे दुसरे दोन मोठे आधारस्तंभ म्हणजे माझे मित्र वामनरावजी देशपांडे व वामनरावजी चोरघडे हे होत. देशपांडे यांनी ' युगवाणी ' चें संपादन इतक्या आस्थेने व अभिजात चिकित्सकपणाने केलें की त्याला दुसरी कसलीच उपमा देतां येणार नाहीं. ' युगवाणी ' ला केवळ एका वर्षांत साहित्याच्या क्षेत्रांत जो उच्च दर्जा प्राप्त झाला आहे त्याचें श्रेय लेखक वर्गाइतकेंच त्याला एकत्रित करण्याचें कौशल्य प्रकट करणारे वामनराव देशपांडे यांना आहे. श्री. चोरघडे यांनी, अतिशय जिकिरीचे उद्योग मागे असतांना संघाच्या दोन उपसमित्यांचें काम उत्कृष्ट रतीने संभाळलें. श्री. ऋषभदास रांकानी संघाच्या द्वारा देऊं केलेले पारितोषिक हें बऱ्याच अंशीं चोरघडे यांच्या कर्तबगारीचे फळ आहे. तिसरा हरकामी संघाचा साहाय्यकर्ता म्हणजे श्री. काकासाहेब सहस्त्रबुद्धे. यांनी हरएक बाबतींत संघाला मदत करुन इतकें उपकृत करुन ठेवलें आहे की त्याचें मोल मला करतां येणार नाही. संघाने गेल्या वर्षांत जें काही चांगलें केलें असेल त्याचें श्रेय मुख्यतया उपयुक्त व्यक्तींना आहे, हें नमूद करणें मला माझें कर्तव्य वाटतें.

श्री. ना. वनहट्टी
अध्यक्ष
वि. सा. संघ.

अमरावती
ता. ४-२-४७

• • •

' युगवाणी ' चा दिवाळी-अंक

● ' युगवाणी ' चा पुढील अंक दिवाळी-अंक म्हणून निघणार आहे. या अंकांत पहिल्या प्रतीचे व मौलिक स्वरुपाचे लेख येणार असून शिवाय ललित मजकूरहि भरपूर राहणार आहे. हा अंक नोव्हेंबर अखेर बाहेर पडेल.

ग्राहकांना हा अंक विनामूल्य मिळेल. प्रति मोजक्या निघणार असल्यामुळे ' युगवाणी ' चे ग्राहक होऊन हा अंक वाचकांनी मिळवावा, अशी विनंति आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, अमरावती

सन १९४६ चा (ता. १२-११-४५ ते ३१-१२-४६) जमाखर्चाचा

- तक्ता -

जमा

	रु. आ. पै
साल गुदस्त शिल्लक	४८३-१३-९
आगरकर पारितोषिक निधि	५००- ०-०
हितचिंतक सभासद	१७५- ०-०
तहाहयात सभासद	१२१- ०-०
वीणा प्रकाशन कडून ‘ युगवाणी’च्या तिजोड अंकाची किंमत	११५- ०-०
साधारण सभासद वर्ग १ व ‘ युगवाणी ’ वर्गणीदार (रु. ५ देणारे — रु. ३-९-० व्ही. पी. चें उत्पन्न)	८२८- ९-०
साधारण सभासद वर्ग १ (रु. ३ देणारे – रु. ८ व्ही. पी. चें उत्पन्न)	१६७- ०-०
सा. सभासद वर्ग २ (रु. २ देणारे)	१०४- ०-०
सा. सभासद वर्ग २ (रु. १ देणारे)	८३- ०-०
किरकोळ अंकविक्री	१-१४-०
जाहिरातीचें उत्पन्न	४- ०-०
प्रा. बनहट्टी यांजकडून कर्जाऊ	२९७-११-३
एकुण जमा	२८८१- १-०

खर्च

	रु. आ. पै
‘ युगवाणी ’ प्रीत्यर्थ खर्च	१२८८-१५-३
प्रवास व वाहनखर्च	२७४- ०-३
कार्यालय खर्च	२५०- ०-०
संघासाठी छपाई	१८४-१०-६
तार व टपाल	१५७-१२-०
स्टेशनरी	३३- ८-६
अनामत	१६- ०-०
सभा खर्च व किरकोळ	१६- ४-६
येणें	१६- ०-०
एकूण	२२३७- ३-०
शिल्लक	६४३-१४-०
	२८८१-१-०

हिशेब तपासनिसांचा शेरा

विदर्भ साहित्य संघाचे १९४६ सालचे हिशेब तपासले. वि. सा. संघाचा जमाखर्च बिनचूक ठेवण्यांत आला आहे.

सही
श्री. नी. देशपांडे
हिशेब तपासनीस
ता. ३-९-४७

* * *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची तारीख ६ आक्टोबर १९४७

चालू अंक

'युगवाणी'चा आक्टोबरचा चालू अंक नाट्यांक म्हणून काढावयाचें जाहीर झालें होतें, पण तो विचार सोडून द्यावा लागला आहे. आक्टोबरमध्ये उमरावती येथे महाराष्ट्र 'नाट्य' संमेलन भरावयाचें ठरलें होतें व त्या प्रसंगाने हा नाट्यांक निघावयाचा होता. परंतु प्रचलित खळबळीची राजकीय परिस्थिति व विशेषत: अन्नधान्याचें दुर्भिक्ष्य—यांमुळे उमरावतीकरांना संमेलन भरविण्याची कल्पना केवळ निरुपायाने सोडून द्यावी लागली; आणि, हें संमेलनच स्थगित झाल्यामुळे 'युगवाणी'चा संकल्पित नाट्यांकहि स्थगित करणें अर्थातच प्राप्त झालें!

चालू अंक हा नेहमीच्या स्वरूपांत निघत आहे.

उपाध्ये यांचा कवितासंग्रह

नागपुरचे प्रसिद्ध कवि कै. श्री. रा. ऊर्फ अण्णाजी बोबडे यांचा स्मृतीदिन नागपुरास साजरा होत असतो, असें दिसतें—निदान यंदा तरी तो साजरा होत असल्याचें दिसून येतें! अर्थात् ही गोष्ट उचित अशीच आहे. बोबडे यांच्यामुळे त्यांचे परम स्नेही नागपुरचे दुसरे प्रसिद्ध कवि कै. ज. के. ऊर्फ बुवा उपाध्ये यांचें सहजच स्मरण झालें. बोबडे यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे, तसाच उपाध्ये यांचाहि कवितासंग्रह प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. 'पोपटपंची' पुस्तकांत त्यांच्या बऱ्याच कविता आलेल्या आहेत, हें खरें; परंतु त्यांच्या समग्र कवितांचा संग्रह निघणें जरूर आहे. बुवांचे नागपुरचे निकटचे स्नेही हें मित्रकार्य पार पाडण्यास पुढे सरसावतील, अशी आशा आहे. बुवा दिवंगत होऊन सुमारें दहा वर्षें होतात. त्यांचा समग्र कवितासंग्रह यापूर्वीच निघावयास हवा होता. तथापि तो अजूनहि निघाला, तरी बुवांपुरतें पुष्कळ कार्य झाल्यासारखें होईल.

विदर्भ-साहित्य-संघावरील ऋण

विदर्भ-साहित्य-संघावर सुमारें सतराशें रुपयांचें कर्ज आहे, हें संघाच्या कार्यकर्त्यांस विदितच आहे. हें कर्ज फेडण्याची चिंता कार्यकारी मंडळास आहे, हें उघड आहे. आणि, त्यांचे या दिशेने प्रयत्नहि सुरू आहेत. तथापि इतर वाङ्मयप्रेमी धनिकांनीहि हा बोजा हलका करण्याबाबत हातभार लावावा, अशी त्यांस आग्रहाची विनंति आहे. वऱ्हाड-मध्यप्रांतांत सुविद्य धनिक थोडेथोडके नाहीत. त्यांपैकी एखादा धनिक मनावर घेईल, तर तो एकटाच हा भार कमी करू शकेल! तें शक्य नसल्यास 'दसकी लकडी एकका बोजा' या न्यायाने अनेकांनी मिळून हें ऋण फेडावयास पाहिजे.

विदर्भ-साहित्य-संघाचें वार्षिक अधिवेशन आलें आहे. त्यापूर्वी संघ ऋणमुक्त झाल्यास तें इष्ट होणार आहे. नवीन कार्यकारी मंडळावर कर्जाचा बोजा न पडलेला बरा. हें जाणून सध्याचें कार्यकारी मंडळ—व विशेषत: संघाध्यक्ष रा. पु. य. देशपांडे-हा कर्जाचा प्रश्न पूर्णपणें—किमानपक्षीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत—निकालांत काढतील, अशी उमेद आहे.

साभार पोच

१. 'सारथी' साप्ताहिक (सं. ग. दे. पटवर्धन, १४०८ कसबा पेठ, पुणे. किरकोळ अंक किं. ३ आणे.)

२. 'प्रगति' मासिक (सं. प्र. ना. खोडे, अकोला. वा. ...

• • •

क्र. 36399
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.94.
2

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

“ युगवाणी ” (Yugawani)   Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104/Genl I A अन्वयें ‘ युगवाणी ’ मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

‘ रीटा ’ मुळें आकर्षक केस–उगवतात

केससमृद्धीसाठीं ‘ रीटा ’ हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्त्रवणास त्याने पोषण होते. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठीं तें उत्तम आहे. ‘ रीटा ’ ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळते. ×

RITA
HAIR TONIC

व्हेटा कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास



डोंगरे यांचे बालामृत

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ‘ युगवाणी ’ कार्यालय १९. ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ